घड्याळ म्हंटल की..
**विठ्ठल वॉच**
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती
सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

मराठी नुतन वर्षाच्या व
गुढी पाडवा
सर्वांना हार्दिक शुभेच्छा
-संपादक

वर्ष २९ वे | अंक ३६० | पाने ६ | गुरुवार | दि. १९ मार्च २०२६ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# जिल्हा परिषद अध्यक्षाच्या निवडीकडे जिल्ह्याचे लक्ष

## भाजपाचा दावा खरा ठरणार की राष्ट्रवादी-शिवसेनेची सत्ता येणार

**सातारा/प्रतिनिधी:-**

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाची निवड उद्या शुक्रवारी दि.२० रोजी होणार असून हा हाय व्होल्टेज ड्रामा चांगलाच चर्चेत आहे. भारतीय जनता पक्षाने कोणत्याही परिस्थितीत आमचाच अध्यक्ष होणार असा दावा केला आहे. तर या मिनी मंत्रालयावर आपलीच सत्ता यावी आणि आपलाच अध्यक्ष व्हावा यासाठी राष्ट्रवादी व शिवसेनेने आपले सदस्य परराज्यात टूरवर पाठवले आहेत. हे सदस्य अध्यक्षांच्या निवडणूकी वेळीच थेट येणार असल्याचे समजते त्यामुळे अशा परिस्थितीत भाजपा आपला अध्यक्ष कसा बनवणार आणि कशी फोडाफोडी करणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले असून सत्ता कोणाची याचा फैसला उद्या होणार आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणूकीवेळी राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीतील तीन पक्षात चांगलाच संघर्ष रंगला एकमेका विरोधात हे पक्ष निवडणूकीला सामोरे गेले. निवडणूक काळात भाजपाने दिलेला स्वबळाचा नारा आणि महायुतीच्या नेत्यांच्या मतदारसंघात प्रचारा दरम्यान केलेली घुसखोरी याचा राग मनात धरत जिल्हा परिषदेची सत्ता आपल्याकडेच घ्यायची असा कयास राष्ट्रवादी व शिवसेनेच्या नेत्यांनी रचला असून भाजपाच्या विरोधात स्थानिक स्थरावर झालेल्या या निवडणूकीत हे निवडूण आलेले उमेदवार लढलेले आहेत. जे राष्ट्रवादी व शिवसेनेतून निवडून आलेले सदस्य आहेत त्यांची मानसिकता आपण कोणत्याही परिस्थितीत भाजपा बरोबर जावू नये अशी असल्याचे समजते.



जिल्ह्यातील ११ पंचायत समितीच्या सभापती उपसभापती निवडी पार पडल्या यामध्ये राजकीय कुरघोड्यांचे राजकारण रंगले व सभापतींच्या निवडीत ते दिसून आले. जिल्ह्यातील ११ पैकी ५ पंचायत समितींवर भाजपाची तर ५ पंचायतीत राष्ट्रवादीची आणि १ पंचायत समितीत शिवसेनेची सत्ता आली. हाच ट्विस्ट जिल्हा परिषद अध्यक्ष पदांच्या निवडीत काय घडतो याकडे जिल्ह्याच्या नजरा लागल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत भाजपाने पहिल्यांदाच सर्वाधिक जागा जिंकून भाजपा मोठा पक्ष असल्याचे सिद्ध केले आहे. तर राष्ट्रवादीकडे २१ आणि शिवसेनेकडे १५ सदस्य असून, १ अपक्ष आणि १ काँग्रेस सदस्य आहे. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होण्यासाठी ३३ मतांची आवश्यकता आहे. शिवसेना-राष्ट्रवादीकडे दोन्ही मिळून ३६ सदस्य आहेत. उद्याच्या निवडीत काय घडते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते ११.३० या वेळेमध्ये अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले यांच्याकडे दाखल करण्यात येणार आहे. यानंतर सभेच्या अनुषंगाने आवश्यक बाबी व सदस्यांचे कोरम व स्वाक्षरी तपासणी केली जाणार आहे. दुपारी ११.३० ते १२ उमेदवारी अर्जाची छाननी आणि १२ ते १२.३० या वेळेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेणे. तसेच दुपारी १२.३० नंतर आवश्यक असल्यास मतदान घेतले जाणार आहे.

# सांगली जिल्हा परिषदेवर महाविकास आघाडीची 'गुढी'

## संगीता पाटील अध्यक्ष,तर ऋषिकेश लाड उपाध्यक्ष!

**सांगली/प्रतिनिधी:-**

सांगली जिल्हा परिषदेच्या लक्षवेधी निवडणुकीत महाविकास आघाडीने भाजप युतीला धूळ चारत सत्ता राखली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या संगीता पाटील यांची अध्यक्षपदी, तर काँग्रेसचे ऋषिकेश लाड यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. या विजयामुळे सांगली जिल्हा परिषदेवर महाविकास आघाडीने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.काही दिवसांपासून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू होती. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाजपाचाच अध्यक्ष होणार असा दावा केला होता. माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांनी करेक्ट कार्यक्रमकेल्याने अध्यक्षपदाच्या निवडीत महाविकास आघाडीने बाजी मारली.

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या निवडणुकीत हात उंचावून मतदान घेण्यात आले. यामध्ये महाविकास आघाडीच्या बाजूने पारडे जड राहिले. महाविकास आघाडीच्या संगीता पाटील यांना ३४ मते मिळाली, तर भाजप युतीच्या स्वप्नाली मासाळ यांना २५ मते मिळाली. संगीता पाटील यांनी ९ मतांच्या फरकाने विजय संपादन केला.

काँग्रेसचे ऋषिकेश लाड यांना ३४ मते मिळाली, तर भाजप युतीचे उमेदवार हिम्मत जाधव यांना २५ मतांवर समाधान मानावे लागले.



भाजपकडून अध्यक्षपदासाठी स्वप्नाली मासाळ तर शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या शीतल बाबर यांनी अर्ज दाखल केले. तर उपाध्यक्ष पदासाठी भाजपचे जयराज पाटील आणि हिम्मत जाधव यांनी अर्ज दाखल केले. महाविकास आघाडीकडून अध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या संगीता पाटील, प्रतिमा मोरे यांनी अर्ज दाखल केले. तर उपाध्यक्ष पदासाठी काँग्रेसचे ऋषिकेश लाड आणि विद्या कुंभार यांचे अर्ज दाखल झाले.

### कोणी घेतली माघार?

निवडणुकीच्या रिंगणात सुरुवातीला प्रत्येक गटाकडून दोन दोन अर्ज दाखल झाले होते. भाजप युतीच्या शीतल बाबर आणि आघाडीच्या प्रतिमा मोरे यांनी अध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेतली. तसेच उपाध्यक्षपदासाठी आघाडीच्या विद्या कुंभार आणि भाजपच्या जयराज पाटील यांनी आपले अर्ज मागे घेतल्याने लढत थेट झाली.

### शिंदे गटाचे सदस्य अनुपस्थित

या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत आटपाडी तालुक्यातील शिवसेना (एकनाथ शिंदे गट) चे दोन सदस्य जयदीप भोसले आणि पृथ्वीराज पाटील हे अनुपस्थित राहिले, ज्याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.भाजप-युतीसाठी हे दोन सदस्य महत्त्वाचे मानले जात होते, मात्र त्यांच्या अनुपस्थितीमुळे युतीच्या मतांचे गणित बिघडले. महाविकास आघाडीने आपल्या मतांची गोळाबेरीज व्यवस्थित केल्यामुळे ऋषिकेश लाड यांचा विजय सुकर झाला.

विजयानंतर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद परिसरात गुलालाची उधळण करत आणि फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा केला.

मंगळवारी आघाडीच्या नेत्यांची सांगलीत बैठक झाली. त्यामध्ये निवडीची प्रक्रिया, मतदान, व्हीप काढणे आदी प्रक्रियेवर चर्चा झाली होती. अध्यक्ष, उपाध्यक्ष सभापतिपदांची नावे जवळजवळ निश्चित झाली होती. महाविकास आघाडीचे नेते फक्त भाजपाच्या डावपेचांवर लक्ष ठेवून होते.

### अखेरच्या क्षणी भाजपशी हातमिळवणी

सुरुवातीला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांच्या संपर्कात असणारे माजी खासदार संजयकाका पाटील यांनी अखेरच्या क्षणी मात्र भाजपशी हातमिळवणी केली. त्यामुळे संजयकाका समर्थक सदस्यांनी अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीत भाजपच्या पारड्यात मतदान टाकले. त्यामुळे संजयकाकांचे पुन्हा भाजपशी सलोख्याचे संबंध निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

### बहीण-भावाच्या अध्यक्षपदाचा ऐतिहासिक योगायोग

नूतन अध्यक्षा संगीता पाटील या राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराज पाटील यांच्या भगिनी आहेत. सांगली जिल्हा परिषदेच्या इतिहासात बहीण आणि भाऊ या दोघांनीही अध्यक्षपद भूषवण्याचा हा पहिलाच ऐतिहासिक योगायोग जुळून आला आहे.



# जयंत पाटील-गोपीचंद पडळकर समर्थकांची घोषणाबाजी

**सांगली/प्रतिनिधी:-**

सांगली जिल्हा परिषदेवर अखेर महाविकास आघाडीने सत्तास्थापन केली आहे. अध्यक्षपदाच्या निवडीत महाविकास आघाडीने बाजी मारली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार संगीत पाटील विजयी झाल्या आहेत. या निवडीची मागील काही दिवसांपासून राज्यात चर्चा सुरू होती. अध्यक्षपदासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू होती. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाजपाचाच अध्यक्ष होणार असा दावा केला होता. दरम्यान, आता या निवडीने भाजपाला मोठा धक्का मानला जात आहे. या निवडीनंतर जिल्हा परिषदेसमोर कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. यावेळी आमदार जयंत पाटील आणि आमदार गोपीचंद पडळकर

# इस्त्रायलने इराणच्या अणुप्रकल्पा जवळ क्षेपणास्त्र टाकले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-**

मंगळवारी संध्याकाळी इराणच्या एकमेव अणुऊर्जा प्रकल्प, बुशेहरवर, एका क्षेपणास्त्राने हल्ला केल्याने संपूर्ण प्रदेशात घबराट पसरली. प्रकल्पाचे कोणतेही नुकसान झाले नसल्याची माहिती समोर आली. यामध्ये कोणीही जखमी झाले नाही.


ही घटना अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धाच्या तिसऱ्या आठवड्यात घडली. यामुळे अणु अपघाताचा धोका पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

रशियाही आता अमेरिकेसारखाच वागू लागला! भारताला नाकारून पाकिस्तानला स्वस्त दराने तेल देणार

इराणने तात्काळ आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीला सूचित केले. संयुक्त राष्ट्रांच्या अणुऊर्जा देखरेख संस्थेने आपल्या अधिकृत ट्विटर खात्यावर लिहिले की, इराणने कळवले आहे की मंगळवारी संध्याकाळी बुशेहर अणुऊर्जा प्रकल्पाच्या संकुलावर एक क्षेपणास्त्र आदळले. या प्रकल्पात किंवा कर्मचाऱ्यांमध्ये कोणतीही हानी झाली नसल्याचे एजन्सीने स्पष्ट केले.

IAEA चे प्रमुख राफेल ग्रोसी यांनी संघर्षादरम्यान सर्व पक्षांना कमाल संयम बाळगण्याचे तात्काळ आवाहन केले. त्यांनी सांगितले की, अणुऊर्जा प्रकल्पांजवळ कोणताही हल्ला झाल्यास गंभीर अणु दुर्घटना घडू शकते. इराणच्या अणुऊर्जा संघटनेनेही या हल्ल्याची पुष्टी केली आहे. तस्निम वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, बुशेहर या बंदर शहरातील प्रकल्पाजवळ सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास हा क्षेपणास्त्र पडला.

अणु ऊर्जा प्रकल्पाचे कोणतेही नुकसान झाले नाही. रेडिएशनचा स्तर सामान्य असल्याचेही त्यांनी सांगितले.या घटनेमुळे प्लांटच्या सुरक्षा प्रणालीबद्दल निश्चितच प्रश्न निर्माण झाले आहेत, पण सध्या तरी कोणतीही मोठी समस्या नोंदवण्यात आलेली नाही.रशियाच्या रोसाटॉमने हल्ल्याचा निषेध केला



रशियाची सरकारी अणुऊर्जा कंपनी, रोसाटॉमने, या हल्ल्याचा निषेध केला आहे. कंपनीने म्हटले आहे की, बुशेहर प्रकल्पाच्या परिसरातील किरणोत्सर्गाची पातळी पूर्णपणे सामान्य आहे. या प्रकल्पाचे बांधकाम १९७० च्या दशकात एका जर्मन कंपनीने सुरू केले होते आणि नंतर रशियाने ते पूर्ण केले. कोणताही अपघात टाळण्यासाठी प्रकल्पाजवळ कोणतीही कृती करण्यापासून परावृत्त होण्याचे आवाहन रोसाटॉमने सर्व पक्षांना केले आहे.

बुशेहर प्रकल्प हा इराणचा एकमेव कार्यरत अणुऊर्जा प्रकल्प असून तो पर्शियन आखाताच्या किनाऱ्यावर वसलेला आहे. हा परिसर सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. या घटनेनंतर तेथे सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

### भिन्न पाडवा ..

वसंतोत्सव स्वागत
बदल हो प्राकृतिक
चैत्र शुद्ध प्रतिपदा
पाडवा हा नैसर्गिक
आप्त मित्र भेटतात
सोहळा रे भावनीक
ऑनलाईन शुभेच्छा
सण होई आधुनिक
राम आले आयोध्या
कैककथा पौराणिक
जलाराम महोत्सवी
सण जाणा धार्मिक
शक संवत्सर प्रारंभ
कथासार्थ आगळीक
दान धर्म पुजा कर्म
साधे आर्त जवळीक
रात्रछोटी दिस मोठा
मूळ कळे वैज्ञानिक
पहिला सण नववर्षी
पाडवा हा अलौकिक
लिंबपाला चर्वण करे
सत्वपूर्ण आयुर्वेदिक
आरोग्या सांभाळावे
सत्कर्म करता वैदिक
जाणून घेवून साजरा
महत्व येईल मौक्तीक
पाडवा सण कैकगुण
मोजू किती सांख्यिक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**



# कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यास कटिबद्ध:ना.पाटील

पाटण/प्रतिनिधी : - कोयना प्रकल्पग्रस्तांचे शंभर टक्के विकसनशील पुनर्वसन करण्यासाठी आपण कटिबद्ध आहे. तसेच कोयना प्रकल्पासाठी वाटेल त्या परिस्थितीत प्रश्न सोडवण्यासाठी आपण कायम आग्रही आहोत, अशी ग्वाही राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

सातारा जिल्ह्यातील १३७ त्याचबरोबर कोयना लाभक्षेत्रातील १५७ व सांगली जिल्ह्यातील १३४ प्रस्ताव मंजुरीसाठी विभागीय आयुक्त पातळीवरून तत्काळ मंत्रालयात सादर करण्यात यावेत, असे निर्देश देत याबरोबर ज्यांनी आपली जमीन कोयना हायड्रोइलेक्ट्रिक प्रोजेक्टसाठी दिली आहे, त्यात रसाटी, गोकुळ तर्फे हेळवाक, शिवंदेश्वर या गावातील लोकांच्या पुनर्वसनाबाबत निर्णय घेण्यात येतील आणि योग्य तो मार्ग

श्री चैतन्य टेस्ट ट्युब बेबी सेंटर
तुमच्या मातृत्वाच्या स्वप्नांना आमची साथ..!
१२ वर्षे विश्वासाची,
गुढी हजारो मातृत्व स्वप्नपूर्तींची!
गर्भधारणेत समस्या असलेल्या जोडप्यांसाठी
मोफत वंध्यत्व निवारण मार्गदर्शन



१२ वर्षांची यशस्वी परंपरा
८,५००+ हून अधिक जोडप्यांना अपत्यप्राप्ती देण्यात यश!
बारामती 8308 02 1900
सातारा 8308 02 1900
अहिल्या नगर 8308 02 1900
पुणे 8308 02 1900
सोलापूर 8308 02 1900
उपलब्ध सुविधा:
वंधत्व असणाऱ्या जोडप्यांचे समुपदेशन व संपूर्ण तपासणी | IVF | ICSI | हिस्ट्रोस्कोपी लॅप्रोस्कोपी लेझर हॅचिंग | ब्लास्टोसिस ट्रान्स्फर
१२ वर्षांची यशस्वी परंपरा ८,५००+ हून अधिक जोडप्यांना अपत्यप्राप्ती देण्यात यश!
श्री चैतन्य टेस्ट ट्युब बेबी सेंटर
बारामती | सातारा | अहिल्यानगर | पुणे | सोलापूर
मातृत्वाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आजच संपर्क करा!
8308-04-1900

# संपादकीय

## जागतिक सत्तासंघर्षाकडे

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर चीनने इराणला दिलेल्या संभाव्य मदतीबाबत अमेरिकन अहवालातून समोर आलेल्या दाव्यांनी जागतिक राजकारणात नव्या तणावाला तोंड फोडले आहे. चीन, इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील हे गुंतागुंतीचे समीकरण आता केवळ प्रादेशिक संघर्ष न राहता जागतिक सत्तासंघर्षाचे रूप घेत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. अमेरिकेतील युएस चायना इकॉनॉमिक अँड सिक्युरिटी रिव्ह्यू कमिशन या संस्थेच्या अहवालात चीनकडून इराणला ड्रोन, अँटी-शिप क्रूझ क्षेपणास्त्रांसाठी लागणारे तंत्रज्ञान आणि रॉकेट इंधनाशी संबंधित रसायने पुरवली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. या दाव्यांमुळे केवळ लष्करी समीकरणेच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गेल्या काही दशकांत चीनने आर्थिक शक्ती म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली होती. परंतु आता तो हळूहळू भूराजकीय शक्ती म्हणूनही उभा राहत असल्याचे दिसते. विशेषतः इराणसोबत २०२१ मध्ये झालेल्या २५ वर्षांच्या व्यापक करारानंतर या संबंधांना नवे आयाम मिळाले. या कराराअंतर्गत चीनने इराणमध्ये पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले, तर इराणने स्वस्त दरात तेल-गॅस पुरवठा करण्याची तयारी दर्शवली. ही भागीदारी केवळ आर्थिक नसून रणनीतिक आहे. मध्यपूर्वेत अमेरिकेच्या वर्चस्वाला तोलण्यासाठी चीनने इराणला आपला नैसर्गिक भागीदार मानले आहे. यामुळेच आज जर चीन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे इराणच्या लष्करी क्षमतेला बळ देत असेल, तर त्यामागे दीर्घकालीन रणनीती असल्याचे मानावे लागेल.

या अहवालात उल्लेख करण्यात आलेले चीनचे बाइडू नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टम (बीडीएस) हे केवळ एक तांत्रिक साधन नाही, तर भविष्यातील युद्धाचे स्वरूप बदलणारे शस्त्र आहे. जसे जीपीएस अमेरिकेसाठी महत्त्वाचे आहे, तसेच चीनचे बीडीएस त्याच्या लष्करी आणि आर्थिक विस्ताराचे प्रमुख साधन ठरत आहे. जर इराण या प्रणालीचा वापर करत असेल, तर त्याच्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांची अचूकता वाढण्याची शक्यता आहे. म्हणजेच, युद्ध केवळ शस्त्रास्त्रांचे न राहता डेटा आणि तंत्रज्ञान यांचे झाले आहे. ही बाब जगासाठी अधिक धोकादायक आहे, कारण अशा प्रकारचे तंत्रज्ञान नियंत्रणाबाहेर गेल्यास त्याचे परिणाम अनियंत्रित होऊ शकतात. चीन आणि इराण यांच्यातील वाढती जवळीक ही ब्रिक्स आणि शांघाय कार्पोरेशन ऑर्गेनायझेशन या व्यासपीठांमुळे अधिक दृढ होत आहे. या संघटनांमधून अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चिमात्य गटाला पर्याय उभा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या नव्या आघाड्यांमुळे बहुध्रुवीय जग ही संकल्पना अधिक स्पष्ट होत आहे. एकेकाळी अमेरिका हेच जागतिक नेतृत्व मानले जात होते, परंतु आता चीन, रशिया आणि त्यांच्या सहयोगी देशांनी या वर्चस्वाला आव्हान दिले आहे.

जर चीनने उघडपणे इराणच्या बाजूने उडी घेतली, तर हा संघर्ष केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित राहणार नाही. रशियासारखे देशही या समीकरणात सक्रिय झाले, तर परिस्थिती नव्या शीतयुद्धाकडे झुकू शकते. याचा सर्वात मोठा फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसणार आहे. तेल आणि गॅसच्या किमतींमध्ये वाढ, पुरवठा साखळीतील अडथळे आणि महागाईचा वाढता दबाव हे सर्व परिणाम आधीच दिसू लागले आहेत. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते. भारत या घडामोडींकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहू शकत नाही. भारताचे इराणसोबत ऐतिहासिक आणि ऊर्जा क्षेत्रातील संबंध आहेत, तर अमेरिका आणि इस्रायलसोबतही धोरणात्मक भागीदारी आहे. त्यामुळे या संघर्षात संतुलन राखणे ही भारतासाठी मोठी कसरत ठरणार आहे. भारताने स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी म्हणजेच स्वायत्त परराष्ट्र धोरण कायम ठेवत, कोणत्याही एका गटात अडकून न पडता आपल्या हितसंबंधांचे रक्षण करणे आवश्यक आहे. तसेच, ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण आणि स्वावलंबन यावर अधिक भर देण्याची गरज आहे.

अशा प्रकारच्या अहवालांमुळे एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो, या दाव्यात कितपत तथ्य आहे ? आधुनिक युद्धात माहिती हेच सर्वात मोठे शस्त्र बनले आहे. विविध देश आपापल्या हितासाठी माहितीचा वापर करतात, कधी कधी दिशाभूलही करतात. म्हणूनच, चीन-इराण संबंधांबाबतचे हे दावे तपासून पाहणे आवश्यक आहे. परंतु, जरी या दाव्यांमध्ये काही अंश सत्य असेल, तरीही त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असू शकतात. मध्यपूर्वेतील सध्याचा संघर्ष हा केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित नाही. तो जागतिक सत्तासंतुलन बदलण्याची क्षमता ठेवतो. चीनने इराणला दिलेली संभाव्य मदत ही या बदलत्या समीकरणांची सुरुवात असू शकते. आज जग एका नव्या वळणावर उभे आहे, जिथे आर्थिक स्पर्धा, तांत्रिक वर्चस्व आणि लष्करी शक्ती यांचा संगम होत आहे. या पार्श्वभूमीवर, कोणताही छोटा निर्णय मोठ्या संघर्षाला कारणीभूत ठरू शकतो. अशा वेळी जागतिक समुदायाने संयम, संवाद आणि कूटनीती यांना प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा, हा संघर्ष केवळ मध्यपूर्वेत न थांबता संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेऊ शकतो आणि त्याची किंमत प्रत्येक देशाला, प्रत्येक नागरिकाला मोजावी लागू शकते.

अमेरिका-इस्रायलविरुद्ध इराण युद्धामुळे जागतिक समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. आता चीन, रशियासारख्या मोठ्या देशांनी या युद्धात भाग घेतला तर हे युद्ध दीर्घकाळ सुरू राहील, असे वाटते. मात्र इराणने नुकतेच जाहीर केले आहे की, हे युद्ध जास्त काळ सुरू राहील, असे वाटत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर काय घडामोडी होणार हे पहावे लागेल. परंतु सदर युद्धाचा जगातील अनेक देशांवर आर्थिक ताण व परिणाम दिसून येत आहे.

# जयंत पाटलांचा करेक्ट कार्यक्रम

## सांगली जि.प.मध्ये बदलाची राजकीय खेळी यशस्वी



**सांगली जिल्हा परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीने मिळवलेला विजय हा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेतील सत्ताबदल नाही,तर राज्याच्या राजकारणात बदलत्या समीकरणांचा एक महत्त्वाचा संकेत आहे. राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी पुन्हा एकदा आपल्या राजकीय चातुर्याची छाप जिल्हा परिषद सत्तास्थापनेत पाडत करेक्ट कार्यक्रम केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीला धक्का देत महाविकास आघाडीने सांगली जिल्हा परिषद काबीज केली,हे आगामी राजकीय संघर्षांचे सूचक मानले जात आहे.**



या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या संगीता पाटील यांनी अध्यक्षपद पटकावत आघाडीच्या विजयाला शिक्कामोर्तब केले. त्यांना मिळालेली ३४ मते ही केवळ आकडेवारी नाही, तर संघटित रणनीती आणि आघाडीतील समन्वयाचे प्रतीक आहे. दुसरीकडे भाजपच्या उमेदवाराला अपेक्षित पाठबळ मिळू न शकल्याने महायुतीच्या अंतर्गत तणावाचा प्रत्यय आला. या विजयामागे महाविकास आघाडीचे नेते विश्वजीत कदम, विशाल पाटील आणि विशेषतः जयंत पाटील यांची अचूक रणनीती निर्णायक ठरली. स्थानिक पातळीवरील मतांचे गणित, सदस्यांशी सातत्याने संपर्क आणि विरोधकांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे, या सर्व घटकांचा योग्य संगम साधण्यात आघाडी यशस्वी ठरली.

महत्त्वाची बाब म्हणजे, निवडणुकीपूर्वी भाजपकडून अध्यक्षपद निश्चित असल्याचा दावा करण्यात आला होता. ना. चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केलेला आत्मविश्वास प्रत्यक्ष निकालात दिसून आला नाही. यामुळे केवळ सांगलीतच नव्हे, तर राज्यभर भाजपच्या स्थानिक संघटनात्मक क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीतही महाविकास आघाडीने आपले वर्चस्व कायम राखले. ऋषिकेश लाड यांनी ३४ मते मिळवत विजय मिळवला. भाजप-युतीचे उमेदवार हिम्मत जाधव यांना २५ मतांवर समाधान मानावे लागले. अध्यक्षपदापाठोपाठ उपाध्यक्षपदावरही विजय मिळवून आघाडीने जिल्ह्यातील सत्तेवर मजबूत पकड निर्माण केली. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वाधिक चर्चेत राहिलेला मुद्दा म्हणजे शिंदे गटाच्या दोन सदस्यांची अनुपस्थिती होय. जयदीप भोसले आणि पृथ्वीराज पाटील यांच्या गैरहजेरीमुळे महायुतीचे गणित कोलमडले. ही अनुपस्थिती केवळ योगायोग होता की, त्यामागे काही राजकीय संकेत आहेत, याबाबत विविध तर्क-वितर्क मांडले जात आहेत. स्थानिक पातळीवर महायुतीतील समन्वयाचा अभाव आणि अंतर्गत मतभेद यामुळे हा परिणाम घडल्याचे दिसून येते.



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

महाविकास आघाडीने निवडणुकीच्या एक दिवस आधीच घेतलेल्या बैठकीत संपूर्ण रणनीती आखली होती. व्हीप जारी करणे, सदस्यांची उपस्थिती सुनिश्चित करणे आणि मतदानाच्या प्रक्रियेत शिस्त राखणे, या सर्व बाबींमध्ये आघाडीने काटेकोरपणा दाखवला. याउलट महायुतीमध्ये समन्वयाचा अभाव आणि काही प्रमाणात आत्मविश्वासाचा अतिरेक दिसून आला. या निकालाचे व्यापक राजकीय परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे. सांगली हा पारंपरिकदृष्ट्या काँग्रेस-राष्ट्रवादीचा प्रभाव असलेला जिल्हा मानला जातो. मात्र, गेल्या काही वर्षांत भाजपने येथे आपले अस्तित्व वाढवण्याचा प्रयत्न केला होता. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचा विजय हा केवळ सत्ता टिकवण्याचा नाही, तर आपले पारंपरिक बालेकिल्ले मजबूत ठेवण्याचा संदेश देणारा आहे. याचबरोबर, हा निकाल आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांसाठीही महत्त्वाचा ठरू शकतो. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्ता ही मोठ्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांची उर्जा आणि संघटनात्मक बळ वाढवण्याचे माध्यम असते. त्यामुळे सांगलीतील विजयामुळे महाविकास आघाडीला राजकीय आत्मविश्वास मिळणार आहे.

भाजपसाठी मात्र हा निकाल आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित करणारा आहे. स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे, सहयोगी पक्षांशी संबंध दृढ करणे आणि निवडणूक व्यवस्थापनात अधिक काटेकोरपणा आणणे, या गोष्टींची आवश्यकता आता अधिक तीव्रतेने जाणवू लागली आहे. राजकारणात आकड्यांचे गणित जितके महत्त्वाचे असते, तितकेच मानवी संबंध आणि विश्वासही महत्त्वाचा असतो. सांगली जिल्हा परिषद निवडणुकीने हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. महाविकास आघाडीने एकसंघ राहून आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास विजय शक्य आहे, हे दाखवून दिले आहे. एकूणच, सांगलीतील हा करेक्ट कार्यक्रम केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित नाही. तो महाराष्ट्राच्या राजकारणात पुढील काळात काय घडू शकते, याची झलक देणारा आहे. महाविकास आघाडीने मिळवलेले हे यश टिकवून ठेवणे आणि भाजपने या पराभवातून धडा घेणे, या दोन्ही गोष्टी आगामी राजकीय घडामोडींमध्ये निर्णायक ठरणार आहेत.

# गुढीपाडवा: संपूर्ण सृष्टीसाठी शुभ, समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक

फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करून संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते. फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य.हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात.कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे. हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवासण साजरा करतो. आपल्या दाराशी गुढी उभारून समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते. गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच! कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करून त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले. त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला. याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो. याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रूप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री



**रमेश लांजेवार नागपूर**

शालिवाहन राजाने शके गणनेला सुरूवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला.मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे. अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी, कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला जातो. या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि निरोगी रहावे. या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो. कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दु:ख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे. आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत, स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे. हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.चैत्राची सुरूवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरू होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे १५ ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारून नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो. त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो. गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते. गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी.मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन



येते.इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा दाखवून जल्लोष साजरा करण्यात येतो. परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने, आदरतीथ्याने, प्रेमाने, मानसन्माने आणि मुख्यत्वे करून आरोग्याचा दृष्टीकोन सामोरं ठेवुन साजरा करण्यात येतो. त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात जमिन आसमानचा फरक दिसून येतो. महाराष्ट्रासह भारतात बदलते हवामान लक्षात घेता व वाढते प्रदूषण पहाता आणि वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे. यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना सावली, मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.

# रमाई आवास घरकुल योजनेचे अनुदान वाढवून ५ लाख करावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे उत्तम गायकवाड यांची मागणी

**अक्कलकोट/ महेश गायकवाड:-**

रमाई घरकुल आवास योजनेच्या अनुदानात वाढ करून ते पाच लाख रुपये करावे अशी मागणी व कळकळीची विनंती आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते आणि माजी नगरसेवक व यु. जी कंपनी चे संस्थापक अध्यक्ष उत्तम गायकवाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अक्कलकोट तालुक्याचे लोकप्रिय आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

उत्तम गायकवाड यांनी निवेदनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांना कळकळीची विनंती केली आहे की, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवा भाऊ आणि आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी



यांनी सध्या रमाई आवास योजनेच्या मिळत असलेल्या अनुदानात ५०टक्के वाढ करून अडीच लाखावरून ते ५ लाख करावे. .

आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ नेते उत्तम गायकवाड यांनी पुढे म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री आदरणीय देवाभाऊ फडणवीस साहेब यांना विनंतीपूर्वक मागणी करतो की मागासवर्गीय नागरिकांना पक्के घर बांधण्यासाठी मातोश्री रमाई घरकुल योजना अंतर्गत अनुदान २,५०,०००/- रुपये इतके मिळतअसते . परंतु सध्याची परिस्थिती पाहता एखादे घर बांधायचे म्हटले तर वाढलेली मजुरी व मटेरियल लक्षात घेता कमीत कमी १०,०००००/- लाख रुपये इतका खर्च येतो. सदर बाबत विचार विनय करून मातोश्री रमाई घरकुल योजनेअंतर्गत मिळणारा अनुदान शहरी भागात २,५०,०००/- हजार रुपये वरून कमीत कमी ५०% अनुदानाच्या स्वरूपात वाढ करून ते ५,०००००/- लाख रुपये इतके अनुदान करण्यात यावे अशी कळकळीची नम्र विनंती आहे

अक्कलकोट तालुक्याचे आमचे लाडके आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी हा प्रस्ताव गोरगरिब मागासवर्गीय यांच्या कल्याणासाठी असलेला हा प्रस्ताव विधानसभेमध्ये मांडावा व भारतरत्न डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आंबेडकरी समाजाला भेट म्हणून बिल मंजूर करून घ्यावे ही महाराष्ट्र राज्यातील गोरगरीब मागासलेल्या मागासवर्गीय समाजाच्या वंचित बहुजन घटकांच्या गोरगरीब दलित जनतेच्या आणि समाजाच्या वतीने माझी नम्र विनंती आहे. असेही उत्तम गायकवाड यांनी निवेदनात म्हटले आहे.

# एपीएसईझेडच्या कोलंबो टर्मिनलने पहिल्याच वर्षात एक दशलक्ष कंटेनर्स हाताळले

१८ मार्च २०२६: अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड) ने कोलंबो वेस्ट इंटरनॅशनल टर्मिनल (सीडब्ल्यूआयटी),कोलंबो येथे महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, कार्यारंभाच्या पहिल्याच वर्षात एक दशलक्ष टीईयू (ट्वेंटी-फूट इक्विव्हॅलेंट युनिट्स) पेक्षा अधिक कंटेनर्स हाताळले आहेत. एप्रिल २०२५ मध्ये सुरू झालेल्या या टर्मिनलने पोर्ट ऑफ कोलंबो मधील सर्वात वेगवान रॅम्प-अपचा विक्रम प्रस्थापित केला असून, एपीएसईझेड च्या वाढत्या जागतिक उपस्थितीचे आणि कार्यक्षमतेचे द्योतक आहे.

अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड, जॉन कील्स होल्डिंग्स पीएलसी आणि श्रीलंका पोर्ट्स अथॉरिटी यांच्या भागीदारीत विकसित झालेल्या या टर्मिनलमध्ये सुमारे ८०० दशलक्ष डॉलर्सची गुंतवणूक करण्यात



आली आहे. उद्घाटन वर्षातच एवढ्या प्रमाणावर पोहोचणाऱ्या जगातील निवडक कंटेनर टर्मिनल्समध्ये सीडब्ल्यूआयटी चा समावेश झाला असून, जागतिक शिपिंग लाईन्ससोबतचे मजबूत समन्वय आणि कार्यक्षम ऑपरेशन्स याचे प्रतिबिंब यात दिसते.

महत्त्वाच्या पूर्व-पश्चिम सागरी मार्गांवर धोरणात्मकदृष्ट्या स्थित असलेले कोलंबो हे शहर आशिया, मध्य पूर्व आणि युरोपला जोडणारे प्रमुख ट्रान्सशिपमेंट हब म्हणून आपले स्थान अधिक बळकट करत आहे. सीडब्ल्यूआयटी चे प्रारंभिक यश जागतिक व्यापार प्रवाहांमध्ये इंडियन ओशियन रिजन(आयओआर) चे वाढते महत्त्व अधोरेखित करते आणि ब्लू इकॉनॉमीमध्ये बंदर पायाभूत सुविधांची वाढती भूमिका दर्शवते.

सीडब्ल्यूआयटी हे पोर्ट ऑफ कोलंबो मधील पहिले पूर्णतः स्वयंचलित डीप-वॉटर टर्मिनल असून,अत्याधुनिक अल्ट्रा-लार्ज कंटेनर जहाजे हाताळण्यासाठी तयार करण्यात आले आहे. १,४०० मीटर लांबीचा क्वे, सुमारे २० मीटर पाण्याची खोली आणि अंदाजे ३.२ दशलक्ष टीईयू वार्षिक क्षमता यामुळे कोलंबोची माल हाताळणी क्षमता लक्षणीयरीत्या वाढते. आधुनिक डिजिटल प्रणाली, प्रगत क्रेन्स आणि इलेक्ट्रिफाइड यार्ड उपकरणांमुळे जलद टर्नअराउंड वेळ आणि अधिक कार्यक्षमता सुनिश्चित होते.

हा टप्पा एपीएसईझेड ला भारतातील सर्वात मोठा खाजगी बंदर ऑपरेटर म्हणून अधिक बळकट करतो, ज्याच्या पोर्टफोलिओमध्ये भारतातील १५ आणि परदेशातील ४ बंदरे आहेत. जॉन कील्स होल्डिंग्स पीएलसी आणि श्रीलंका पोर्ट्स अथॉरिटी यांच्यासोबतचे सहकार्य जागतिक तज्ज्ञता आणि स्थानिक भागीदारीचे यशस्वी मिश्रण दर्शवते आणि सीडब्ल्यूआयटी ला विकसित होत असलेल्या जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वपूर्ण केंद्र बनवते.

# विद्यार्थ्यांनी डिजिटल तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊन आपले व गावचे नाव उज्वल करावे

## स्वामीराव सुरवसे

**अक्कलकोट /प्रतिनिधी:-**

विद्यार्थ्यांनी डिजिटल तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊन आपले व गावचे नाव उज्वल करावे असे आवाहन कुरनूर येथील नागनाथ प्रशालेचे माजी मुख्याध्यापक स्वामीराव सुरवसे सर यांनी केले.

कुरनुर येथील नागनाथ प्रशाला, येथे लॅपटॉप लॅब उद्घाटन सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. कुरनूर येथील नागनाथ प्रशाला, येथे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने लॅपटॉप लॅब उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपले विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कुरनूर गावचे माजी सरपंच अमरभाऊ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एम. के. माने होते.



या प्रसंगी स्वामीराव सुरवसे, नारायण मोरे, बापूराव सुरवसे, सिद्धनाथ जगताप हे मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे कुरनूर गावचे सुपुत्र श्री ज्ञानेश्वर पाटील (IAS) साहेब यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मोठे योगदान देत नागनाथ प्रशालेस २० लॅपटॉप भेट स्वरूपात प्रदान केले आहेत. या लॅपटॉपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक संगणक व डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही भाषणातून शिक्षणात संगणक व डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले.उद्घाटक अमरभाऊ पाटील यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून शिक्षणात प्रगती करण्याचे आवाहन केले.

स्वामीराव सुरवसे सर यांनी आपल्या भाषणातून डिजिटल तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी आपले व गावचे नाव उज्वल करावे असे मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण बागल यांनी केले तर आभार प्रदर्शन अहिल्या सलगरे यांनी केले.

या कार्यक्रमास कांबळे, बेडगे, मोरे, स्वामी, मोरे मॅडम, पठाण, त्रिमूर्ती माने, रविराज माने, अनिल काजळे व शिवराम काळे तसेच शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेच्या शाळा प्रत्येक गावच्या शान आणि अभिमान आहेत

## प्रा रेखा सोनकवडे;खैराट शाळेत गुढीपाडवा पट वाढवा अभियान सुरू

**अक्कलकोट/प्रतिनिधी:-**

जिल्हा परिषदेच्या शाळा प्रत्येक गावच्या शान आणि अभिमान आहेत यासाठी नागरिकांनी आपल्या पाल्याला जिल्हा परिषदेच्या शाळा मध्ये शिक्षण द्यावे आणि देशाचे सुसंस्कृत नागरिक घडवावे असे आवाहन खैराट येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रा रेखा सोनकवडे यांनी केले. खैराट शाळेत गुढीपाडवा पट वाढवा अभियान सुरू करण्यात आले याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात प्रा. रेखा सोनकवडे बोलत होत्या.

जि.प.प्राथमिक मराठी शाळा खैराट ता अक्कलकोट या शाळेत गुढी पाढवा पट वाढवा या उपक्रमांतर्गत विविध उपक्रम घेऊन शासनाच्या उपक्रमाची माहिती देऊन सहकार्य घेतलं



.गावात दखलपात्र विद्यार्थ्याच्या घरी जाऊन पालकांशी संवाद साधला व पाडाव्यापूर्वी दखलपात्र विद्यार्थ्याना शाळेत प्रवेश द्यायचा आहे आणि गुढी पाडवा पट वाढवा या अभियानात उस्फूर्त भाग घेण्याविषयी विनंती केली. दि. १८/३/२०२६ रोजी शाळेत विशेष कार्यक्रम घेण्यात आला .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनील होनाजे होते.प्रथम आज दाखल झालेल्या विद्यार्थ्याच्या अंगावर फुलांचा वर्षाव करण्यात आला.

फुले देऊन स्वागत करण्यात आले .खाऊ देण्यात आले .पालकांचेही स्वागत शाळेच्या वतीने बाळूसिंग राजपुत यांनी केले .गुढी पाडवा पट वाढवा या अभियानात शाळा व्यवस्थापन समिती पालक सक्रिय सहभागी झाले आणि दाखलपात्र नावे काढण्यापासून ते शाळेत दाखल होईपर्यंत मदत केली. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले असे रेखा सोनकवडे म्हणाल्या .आपली जिल्हा परिषद शाळा ही प्रत्येक गावची शान व अभिमान आहे. तिला जपणे हे प्रत्येक ग्रामस्थांचे कर्तव्य आहे .आपल्या मुलांना मराठी शाळेतच प्रवेश दया. आजपर्यंतचा अधिकारी वर्गाचा इतिहास बघितला तर ते शक्यतो ग्रामीण भागातील जि.प .मराठी शाळेतच शिक्षण घेतलेले आहेत आणि ते मोठमोठे अधिकारी आहेत .असच आशा यादीत तुमच्या गावातील तुमची लेकरं असतील. म्हणून इतरत्र पैसे वाया न घालवता आपल्या गावातील जि.प .मराठी शाळेतच प्रवेश दया असे रेखा सोनकवडे यांनी पालकांना आवाहन केले .केंद्रप्रमुख श्रीहरी करपे यांच्या मार्गदर्शनाखाली हा गुढी पाडवा पट वाढवा हे अभियान विविध उपक्रमानी साजरा करण्यात आला .फिरोजा नदाफ यांनी माहिती सांगितली व आभार मानले.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com



# ऊसाची अपेक्षित आवक होण्यासाठी वाहतूक यंत्रणा उभारण्याचे काम सुरू

## बाळासाहेब पाटील

**कराड/प्रतिनिधी : –**

सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचा प्रतिदिन ७५०० मे टन गाळप क्षमतेवरून प्रतिदिन ११००० मे टन गाळप क्षमता विस्तारवाढ प्रकल्प सन २०२५–२६ गाळप हंगामात यशस्वीरित्या सुरू झाला आहे. पुढील हंगाम सन २०२६–२७ करिता दैनंदिन गाळप क्षमतेस पुरेल इतक्या ऊसाची आवक होण्यासाठी करिता वाहतूक यंत्रणा उभारण्याचे काम सुरू आहे.

सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याच्या श्रोत्रेवाडी विभागीय शेती कार्यालयांतर्गत सुपने, तांबवे विभागामधील कारखाना कार्यक्षेत्रातील गावांमधील ऊस तोडणी वाहन मालक व वाहतूक कंत्राटदार यांची बैठक राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते.

बाळासाहेब पाटील यांनी बैठकीत ऊस तोडणी वाहन मालक व वाहतूक कंत्राटदार यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार व वाहन मालक यांना कारखान्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवांबाबत माहिती देण्यात आली आणि स्थानिक पातळीवर ऊस तोडणी टोळ्या व वाहतूक यंत्रणा उभारण्यात याव्यात, ऊस वाहतुकीसाठी कारखान्याकडे ट्रक, ट्रॅक्टर आदी वाहने नोंदविण्यात यावीत, त्याबाबतचे करार करण्याचे काम कारखाना कार्यस्थळावर सुरू असून, कारखान्याकडे जास्तीत जास्त करार करण्यात यावे, असे त्यांनी केले.


याप्रसंगी कारखान्याचे संचालक आण्णासाहेब पाटील, संभाजी साळवे, भानुदास कदम, भाऊसो फडतरे, संतोष चव्हाण, बाजीराव पवार, महादेव टोळे, अधिकराव पाटील, प्रकाश माळी, प्रकाश कदम, शिवाजी गाडवे, प्रदीप शिंदे, सतीश पाटील, राजेंद्र पाटील, हणमंत पवार मारुती निकम, सुहास जाधव, कारखान्याचे शेती अधिकारी वसंतराव चव्हाण, उप शेती अधिकारी नितीन साळुंखे यांचेसह ऊस उत्पादक सभासद शेतकरी वाहन मालक, वाहतूक कंत्राटदार आदी उपस्थित होते.

# जावळीच्या सन्मानासाठी जिल्हा परिषदेत सेना नेते आक्रमक

**सातारा/प्रतिनिधी : –**

जिल्ह्याच्या राजकारणामध्ये फलटण व जावळीत दगा फटका झाल्याने शिवसेना आक्रमक झाली आहे. या दोन्ही तालुक्याचा सातारा जिल्हा परिषद निवडीमध्ये सन्मान राखण्यासाठी सेना नेते आक्रमक झाले आहेत. त्यामुळे जावळी तालुक्यातील शिवसेना जि. प. सदस्य सौ. कविता एकनाथ ओंबळे यांना सातारा जिल्हा परिषद उपाध्यक्ष किंवा महिला बालकल्याण समिती सभापती देऊन जावळीकरांचा राग शांत करण्याचा प्रयत्न होणार असल्याचे निश्चित मानण्यात येत आहे.

जावळी तालुक्यामध्ये पंचायत समिती सभापती निवडीच्या वेळेला राष्ट्रवादी एकमेव सदस्य तटस्थ राहिलेले भाजपचे कमळ फुलले आहे. तुतारी वाजवून कमळ फुलवल्यामुळे म्हसवे गटातील राष्ट्रवादीला मतदान करणाऱ्या मतदारांमध्ये नाराजी पसरली आहे. राष्ट्रवादीचा अस्त झाला असला तरी, भाजपला रोखण्यासाठी शिवसेना धनुष्यबाण घेऊन सज्ज झाले आहे. जावळी तालुक्यामध्ये सातारा जिल्हा परिषद सदस्य निवडणुकीत नवसाला पावणाऱ्या श्री काळुबाई देवीच्या कुसुंबी जिल्हा परिषद गटात शिवसेनेचे निष्ठावंत व संपर्कप्रमुख



एकनाथजी ओंबळे यांच्या पत्नी शिवसेनेच्या सौ. कविता एकनाथ ओंबळे या १८० मताधिक्य घेऊन विजयी

झाल्या. सौ. कविता एकनाथ ओंबळे (शिवसेना) ८९५१, सौ. अर्चना ज्ञानदेव रांजणे (भाजपा) ८७७१, सौ. कल्पना गणपत पार्टी (अपक्ष) १२८ नोटा १०५. कुसुंबी गणात भाजपाच्या सौ. पुष्पा चिकणे यांचा सौ. सुनीता दुंदळे यांनी ४८२ मतांनी पराभव केला. पुष्पा जगन्नाथ चिकणे (भाजपा) ३३६७, सुनिता विलास दुंदळे शिवसेना ४२४९ अशी मते मिळाली.

आंबेघर तर्फ मेढा गणात अतिश कदम यांनी भाजपच्या विजय सपकाळ यांचा ७२२ मतांनी पराभव केला. अतिश संतोष कदम शिवसेना ५१७५ विजय बाबाजी सपकाळ भाजपा ४४५३ अशी मते मिळाली. या लढतीकडे संपूर्ण सातारा जिल्ह्याचे लक्ष लागले होते. जावळी पंचायत समिती सभापती, सभापती निवडीमध्ये सुद्धा शिवसेना– राष्ट्रवादी बाजी मारणार असे वाटले असतानाच तटस्थ राजकारणामुळे स्वतःच्या पायावर राष्ट्रवादीने धोंडा मारून घेतला आहे.

शिवसेना नेत्यांनी सातारा शासकीय विश्राम येथे झालेल्या पत्रकार परिषदा घेऊन राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी याबाबत उत्तर द्यावे. अशी मागणी करून त्यांना निरुत्तर केले आहे. तर दुसऱ्या बाजूला शिवसेनेचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सातारा जिल्हा पालकमंत्री तथा पर्यटन मंत्री शंभूराज देसाई आणि संपर्क प्रमुख शरद कणसे यांच्यासह त्याचे सर्व नूतन सदस्यांनी जावळीकरांना उपाध्यक्ष किंवा सभापती पद द्यावे असे थेट मागणी करून एकाच दगडात भाजप, राष्ट्रवादी व जावळीतील शिवसेना वगळून इतर नेत्यांची हंडी फोडण्याचे काम केले आहे. त्याचीही चांगलीच चर्चा रंगू लागलेली आहे.

जावळी तालुक्यातील म्हसवे गटात शिवसेनेचे संदीप पवार यांचा पराभव भाजपने केला नसून राष्ट्रवादीने हा पराभव केल्याचे जावळी पंचायत समिती सभापती निवडीने सिद्ध झाल्याची आता शिवसैनिक उघडपणाने बोलू लागले आहेत. या ठिकाणी एकाच एक लढत असताना भाजपला राष्ट्रवादीने रसद पुरवली. परंतु प्रचार यंत्रणेमध्ये त्याचा साधा अंश सुद्धा दाखवला नाही. एकदम भगदाड पाडले. अशी आता राजकीय चर्चा होताना दिसत आहे.


समाज माध्यमावरही मोठ्या प्रमाणात आरोप प्रत्यारोप होत आहेत. सर्व घडामोडी मध्ये बारकाईने लक्ष असलेल्या शिवसेना नेत्यांनी जावळी मध्ये पुन्हा एकदा शिवसेनेचा धनुष्यबाण उभा करण्यासाठी शिवसेनेच्या जि प सदस्य सौ कविता एकनाथ ओंबळे यांना संधी देण्याचे निश्चित केले आहे. त्या अर्थाने राष्ट्रवादीने टाकलेल्या जाळ्यात राष्ट्रवादीचाच नुकसान झाल्याचे बोलले जात आहे. पक्षीय बलाबल पाहता राष्ट्रवादीकडे २० आणि शिवसेनेकडे १५ असे एकूण३५ सदस्य आहेत भाजपकडे २७ सदस्य असून अध्यक्षपदी ओबीसी प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाल्याने या ठिकाणी राष्ट्रवादीच्या औंध गटातील मनीषा फडतरे यांचे नाव निश्चित झाले आहे. तर उपाध्यक्ष पदासाठी शिवसेनेचे फलटण किंवा कराड , पाटण मध्ये संधी मिळणार आहे असे राष्ट्रवादी शिवसेनेने एकत्रितरित्या विचार विनिमय केला आहे. असे एका सामान्य कार्यकर्त्यांनी विश्वासाने सांगितले.

शेवटी वरिष्ठ नेत्यांपेक्षाही सामान्य कार्यकर्त्यांना व्यक्त केलेला राजकीय अंदाज खरा ठरलेला आहे. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांच्या शब्दाला वजन आले आहे शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीकडे राष्ट्रवादी व शिवसेनेने भगवा फेटा बांधूनच प्रवेश करण्याचे निश्चित केल्यामुळे अध्यक्ष पदही निश्चित मानले जात आहे. या सर्व घडामोडी मध्ये राष्ट्रवादीचे नेते व मंत्री मकरंद पाटील आणि शिवसेनेचे उपनेते तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह स्थानिक नेत्यांची ही प्रतिष्ठा पणाला लागलेली आहे.

# लोकअदालतीत १२६१ प्रकरणांचा विक्रमी निपटारा

## ७.२८ कोटींचे सेटलमेंट;अपघातग्रस्त कुटुंबाला ९ महिन्यांत २३ लाखांची भरपाई

**कराड/प्रतिनिधी : –**



कराड येथे आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत प्रलंबित आणि प्री–लिटिगेशन अशा एकूण १२६१ प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा करत न्यायव्यवस्थेने जलद न्याय देण्याचा आदर्श घालून दिला. या लोकअदालतीत तब्बल ७ कोटी २८ लाख रुपयांहून अधिक रकमेचे सेटलमेंट करण्यात आले असून, अनेक नागरिकांना दीर्घ आणि खर्चिक न्यायालयीन प्रक्रियेतून दिलासा मिळाला.

कराड तालुका विधी सेवा समितीच्या वतीने जिल्हा न्यायाधीश यू. एल. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी एकूण ८ न्यायपीठे स्थापन करण्यात आली होती. न्यायालयात प्रलंबित असलेल्या ८८७ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला, तर ३७४ प्रकरणे प्री–लिटिगेशन टप्प्यातच सामंजस्याने सोडवण्यात आली.

लोकअदालतीत बँक कर्ज वसुली, मोटार अपघात भरपाई, धनादेश अनादर, कौटुंबिक व नागरी वाद अशा विविध प्रकारच्या प्रकरणांचा समावेश होता. दोन्ही पक्षांच्या सहमतीने वाद मिटवण्यावर भर देत न्यायालयाबाहेरच तोडगा काढण्यात यश आले. जिल्हा न्यायाधीश दिलीप भा. पतंगे यांनीही या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवत मार्गदर्शन केले.

या लोकअदालतीत साजूर येथील चव्हाण कुटुंबाचा अपघात भरपाईचा महत्त्वपूर्ण दावा निकाली निघाला. शैला व मनोहर चव्हाण यांचा तरुण मुलगा अपघातात मृत्यूमुखी पडला होता. या दुःखद घटनेनंतर कुटुंबाने न्यायासाठी केलेल्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले.

२५ जून २०२५ रोजी ॲड. उपेंद्र पराडकर यांच्या माध्यमातून दाखल केलेल्या दाव्यावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. विमा कंपनीशी प्रभावी वाटाघाटी केल्यानंतर १४ मार्च २०२६ रोजी झालेल्या लोकअदालतीत या प्रकरणाचा निकाल लागला आणि चव्हाण कुटुंबाला २३ लाख रुपयांची भरपाई मंजूर करण्यात आली. अवघ्या ९ महिन्यांत मिळालेला हा न्याय कुटुंबासाठी मोठा दिलासा ठरला.


या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात कराड बार असोसिएशनचे अध्यक्ष दीपक थोरात, स्थानिक वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागांचे सहकार्य लाभले. लोकअदालतीच्या माध्यमातून वाद सामोपचाराने सोडवण्याची परंपरा अधिक बळकट होत असल्याचे न्यायाधीशांनी नमूद केले.

> लोकअदालतीतून नागरिकांना जलद, सुलभ आणि कमी खर्चात न्याय मिळवून देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सामंजस्याने वाद मिटवण्याच्या या प्रक्रियेमुळे न्यायालयांवरील ताणही कमी होतो. कराडमधील लोकअदालतीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, ही समाधानाची बाब आहे.
>
> – न्या. यू. एल. जोशी

# कराड तालुक्यात सीईओंचा झंझावाती दौरा

## सकाळपासून रात्रीपर्यंत १० गावांना भेट; कामांचा थेट आढावा घेत गुणवाढ व शंभर टक्के अंमलबजावणीचे निर्देश

**कराड/प्रतिनिधी : –**



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी कराड तालुक्यात मंगळवारी दिवसभर तब्बल दहा गावांचा झंझावाती दौरा करत कामकाजाचा सखोल आढावा घेतला. सकाळी आठ वाजता सुरू झालेला हा दौरा रात्री उशिरापर्यंत सुरू राहिला. या दौऱ्यामुळे तालुक्यातील अभियानाच्या कामांना नवचैतन्य मिळाले आहे.

करंजोशी (पुनर्वसित) येथून दौऱ्याची सुरुवात करून नागराजन यांनी शिरवडे, हनुमानवाडी, तळबीड, टेंभू, दुषेरे, धोंडेवाडी, घारेवाडी, तुळसण आणि मनव या गावांना भेटी दिल्या. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल देसाई, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. नामदेव पवार, गटशिक्षणाधिकारी बिपिन मोरे, बालविकास प्रकल्प अधिकारी जी. जी. विभुते, जलसंधारण अधिकारी सौरभ करपे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दौऱ्यात ग्रामपंचायत, प्राथमिक शाळा, अंगणवाडी, पशुसंवर्धन विभाग, तसेच महिला बचत गटांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. शाळांमध्ये उपलब्ध पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून शिक्षणाच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त करण्यात आले.महिला बचत गटांनी 'एक कुटुंब – एक उद्योग' या उपक्रमातून उभारलेल्या व्यवसायांचे विशेष कौतुक करत त्यांना अधिक सक्षम करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मनरेगा व घरकुल योजनांतील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

ग्रामपंचायतींनी कर वसुली शंभर टक्के करण्यावर भर द्यावा, उत्पन्न वाढीसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवाव्यात, तसेच १५ व्या वित्त आयोगातून करण्यात आलेल्या शालेय शौचालये, रेन वॉटर हार्वेस्टिंग व हँडवॉश स्टेशनच्या कामांचेही नागराजन यांनी कौतुक केले. ग्रामपंचायतींच्या गुणांकनात वाढ करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, तांत्रिक व प्रशासकीय सुधारणा तातडीने कराव्यात, तसेच अभियानाच्या अंमलबजावणीत कोणतीही हलगर्जीपणा होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

आरोग्य सेवांच्या दृष्टीने प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला भेट देऊन समाधान व्यक्त करत आवश्यक सुविधांसाठी निधी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गावपातळीवर आरोग्य शिबिरे आयोजित करण्यावरही भर देण्यात आला.

# शालार्थ प्रणालीत मार्च महिन्यापासून मोठे बदल

## अधिक्षक सुनिल शिखरे:बदलाची अंमलबजावणी न केल्यास वेतन होणार नाही

**तांबवे/प्रतिनिधी:–**

बोगस शालार्थ प्रकरण उद्भवू नये यासाठी चालू आर्थिक वर्षापासून शालार्थ प्रणालीमध्ये अमूलाग्र बदल करण्यात आले असून हे बदल मार्च २०२६ च्या वेतन देयकांपासून अमलात येणार असल्याची माहिती वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकचे अधीक्षक सुनील शिखरे यांनी दिली आहे.

याबाबत जिल्ह्यातील सर्व अनुदानित खासगी प्राथमिक, कनिष्ठ महाविद्यालयांचे व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांना सूचना करण्यात आले असल्याचे ची माहिती अधिक्षख सुनिल शिखरे यांनी दिली.

राज्यातील शाळांमध्ये वेतन प्रक्रिया अधिक पारदर्शक व अचूक करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून शालार्थ प्रणालीमध्ये विविध तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी काही

आवश्यक बाबींची पूर्तता करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांचे पालन न केल्यास मार्च २०२६ पासून संबंधित शाळांचे चेतन देवक जनरेट होणार नाही, तसेच ते पुढे फॉरवर्डही करता येणार नाही. या बदलांनुसार प्रत्येक खाजगी अनुदानित प्राथमिक,कनिष्ठ महाविद्यालयाने व माध्यमिक शाळांनी मुख्याध्यापकांची शालार्थ प्रणालीमध्ये स्वतंत्र नोंदणी करणे आवश्यक आहे. प्रभारी प्राचार्य किंवा प्रभारी मुख्याध्यापक असल्यास त्यांचीही नोंद प्रणालीमध्ये करणेबंधनकारक राहणार आहे. तसेच प्रत्येक शाळेचा यू–डायस कोड शालार्थ प्रणालीशी मॅप करणे अनिवार्य करण्यात आला आहे. एका संस्थेच्या दोन शाळांना एकाच यू–डायस कोडचा वापर करता येणार नाही. अशा प्रकारचे मॅपिंग आढळल्यास संबंधित शाळेचे बेतन देयक प्रणालीमध्ये जनरेट होणार नाही, अशी अट घालण्यात आली आहे. याशिवाय शाळांमधील कर्मचायांची वयोमर्यादा देखील प्रणालीद्वारे तपासली जाणार आहे. एखाद्या कर्मचाऱ्याचे वय१८ वर्षा पेक्षा कमी किंवा ६० वर्षा पेक्षा अधिक असल्यास त्या कर्मचाऱ्याला प्रणालीमधून डिटॅच करणे आवश्यक राहणार आहे. तसेच शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण पाहिजे .

वरील सर्व बाधींची पूर्तता झाल्यानंतरच मार्च २०२६ चे वेतन देयक शालार्थ प्रणालीमध्ये जनरेट र फॉरवर्ड होणार आहे. त्यामुळे सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी शालार्थ प्रणालीच्या डॅशबोर्डवर उपलब्ध असलेले मॅन्युअल काळजीपूर्वक अभ्यासून आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, असे आवाहन अधीक्षक सुनील शिखरे यांनी केले आहे.

कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत, म्हणजेच प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला होण्यासाठी संबंधित शाळांनी या सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचेही अधीक्षकांनी नमूद केले आहे.

### शालार्थ मधील बदल

१) शाळा, महाविद्यालय यांनी प्राचार्य व मुख्याध्यापक यांची नोंदणी करणे बंधनकारक, २) शालार्थ मध्ये शाळेचा यु–डायस कोड मॅपिंग करणे, ३) एकच यु–डायस कोड एकाच संस्थेच्या दोन शाळांना मॅप करता येणार नाही, ४) शालार्थ मध्ये कर्मचाऱ्याचे वय १८ पेक्षा कमी आणि ६० पेक्षा जास्त असणार नाही, ५) शालार्थ प्रणाली मध्ये शाळेतील कर्मचाप्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण असणे आवश्यक

# संग्रामसिंह देशमुख यांनी कडेपूरच्या वंचित क्षेत्रास पाणी उपलब्ध करून दिले

**कडेगांव/प्रतिनिधी :–**




कॅबिनेट मंत्री पदाला लाथ मारत दुष्काळी भागाला नवसंजीवनी मिळवून देण्यासाठी टेंभू योजना पदरात पाडून घेणारे दिवंगत लोकनेते आमदार संपतराव देशमुख यांच्या कडेपूर गावचा पश्चिम भाग हा अद्याप टेंभू योजनेच्या पाण्यापासून वंचित राहिला आहे. कडेपूरच्या पश्चिम भागाची टेंभू उशाला आणि कोरड घशाला, अशी अवस्था या भागाची झाली असून, शेतीच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने,सध्या सर्वत्र उन्हाचा तडाका वाढला असल्याने या शिवारातील उसासह अन्य पिके पाण्याच्या प्रतीक्षेत करपून जाण्याची शक्यता असल्याने सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख यांनी या वंचित भागास महालक्ष्मी तलाव कडेपूर येथून गरुड मळा, फडतरे डेअरी, व्यंकटराव यादव वस्ती, बिरोबा मंदिर परिसर येथे शेतीसाठी पाणी ऊपलब्ध करून दिले.

यावेळी जेष्ठनेते विलास गरुड, माजी सरपंच प्रताप यादव, भाजपा जिल्हा कार्यकारिणी सदस्य अशोक साळुंखे, शिवाजीराव जाधव, संग्राम गरुड, सतीश गरुड, संजय जाधव, राहुल फडतरे, दीपक गरुड, सिद्धेश जाधव, प्रल्हाद गरुड, पृथ्वीराज गरुड, संग्राम गरुड, शंकर यादव, सागर यादव, अमर यादव, कदम सर, तेजस यादव, प्रशांत यादव, अजिंक्य कदम, सागर जाधव, श्रीकांत गरुड यांच्या सहकडेपूर ग्रामस्थ शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईश्वरपूरात आज ग्रामदैवत राजेबागेश्वरची यात्रा

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**

हिंदू–मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेली आणि गुढीपाडव्या दिवशी होणारी राजेबागेश्वर या ग्रामदैवताची यात्रा गुरुवारी १९ मार्च रोजी होत आहे. गेल्या चार पिढ्यापासून ही यात्रा चैत्र अमावस्या झाली की दुसऱ्या दिवशी भरते. हिंदू – मुस्लिम ऐक्याची परंपरा अखंड जपणारी ही यात्रा शहराचे सांस्कृतिक आणि अध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करते.



राजेबागेश्वर मंदिराचे पुजारी अशोक कुंडले म्हणाले, गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी समाजातील सर्वजण एकत्र येऊन समाधीवर गंधलेपण करतात. दुसऱ्या दिवशी पहाटे समाधीची पूजा व आरती करून यात्रेची सुरुवात केली जाते. यात्रे दिवशी मंदिर परिसरात विविध प्रकारचे स्टॉल, मनोरंजनाची खेळणीचे स्टॉल लागत आहे. गुडी पाडव्यानंतर मंदिराचे पुजारी एक वर्षासाठी बदल असतात. यावर्षी विजय तुकाराम कुंडले यांना पूजा करण्याचा मान मिळणार आहे. भाविकांनी इच्छेनुसार नारळ अर्पण करावा किंवा समाधीच्या खालील बाजूस नारळ फोडण्याची मंदिर विश्वस्त मंडळाने व्यवस्था केली आहे. त्याठिकाणी भाविक नारळ फोडू शकतात.

उरुण–ईश्वरपूरचे माजी पोलीस पाटील बाळासाहेब पाटील व संजयभाऊ पाटील (धनी) यांचा मानाचा गलेफ चढविण्यात येतो. येथील गायकवाड घराण्यातील राजाराम गायकवाड कुटुंबाचा गलेफ रात्री समाधी स्थळावर चढवला जातो. राजेबागेश्वर भंडारा मंडळ तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. या महाप्रसादाचे संयोजन साहेबराव कोरे करत आहेत.

मंदिर व्यवस्थापन समितीचे विश्वस्त विकास कुंडले, चंद्रकांत कुंडले ,विवेक कुंडले, सुदर्शन कुंडले ,सचिन कुंडले ,राहुल कुंडले, विक्रम कुंडले, अशोक कुंडले, राजेंद्र कुंडले, गणेश कुंडले हे यात्रेचे संयोजन करत आहेत.

# चारचाकीच्या धडकेत एक जण जखमी

**सातारा/प्रतिनिधी:–**

सदर बाजार रामकुंड येथे दिनांक १३ रोजी सायंकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास चारचाकी अपघातात एक जण जखमी झाला आहे.विजय जयवंत आवळे (वय ३५ वर्ष राहणार भीमाबाई आंबेडकर नगर सदर बाजार सातारा) असे जखमीचे नाव आहे.आवळे हे रस्ता ओलांडत असताना त्यांना वाढे फाटा येथून आलेल्या चारचाकी वाहनाने धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले आहे. यावेळी चार चाकी चालकाने जखमीला कोणत्याही प्रकारची मदत न करता चारचाकीसह पळून गेला. त्यांना उपचारासाठी स्थानिकांनी रुग्णालयात दाखल केले. याप्रकरणी अज्ञात चार चाकी वाहनावरील चरकावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मा.उपविभागीय दंडाधिकारी वाळवा विभाग ईश्वरपूर यांचे न्यायालयात**

**जाहीर नोटीस**

क्र एमएजी / जन्म मृत्यू / एसआर–२/२६

रामचंद्र यशंवत ढेबे
रा. जांभळेवाडी ता. शिराळा जि.सांगली

**विरुध्द**

सरकारतर्फे
ग्रामपंचायत अधिकारी जांभळेवाडी
ता शिराळा जि सांगली

जाहीर नोटीस देणेत येते की वरील अर्जदार रामचंद्र यशंवत ढेबे रा. जांभळेवाडी ता. शिराळा जि. सांगली यांनी अर्ज करून वडील कै यशवंत कृष्णा ढेबे यांचा मृत्यू दिनांक २३/७/१९८७ रोजी मोजे जांभळेवाडी ता. शिराळा जि.सांगली येथे झाला असुन त्याची नोंद होणेकामी या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी कायदा कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केला असुन सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा सदर अर्जाच्या सुनावणी कामी पुढील नेमलेली तारीख २/४/२०२६ रोजी सकाळी ११–०० वा.या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे कागदपत्रासोबत मांडावे सदर सुनावणी पर्यंत कोणचीही हरकत न आलेस सदर अर्जास कोणचीही हरकत नसल्याचे समजुन पुढील यथोचित आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/३/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

ठिकाण – ईश्वरपूर
दिनांक १८/३/२०२६

**सही/–**
**(श्रीनिवास अर्जुन)**
**उपविभागीय दंडाधिकारी**
**वाळवा विभाग ईश्वरपूर**

**मा.उपविभागीय दंडाधिकारी वाळवा विभाग ईश्वरपूर यांचे न्यायालयात**

**जाहीर नोटीस**

क्र एमएजी / जन्म मृत्यू / एसआर–२/२६

रामचंद्र यशंवत ढेबे
रा. जांभळेवाडी ता. शिराळा जि.सांगली

**विरुध्द**

सरकारतर्फे
ग्रामपंचायत अधिकारी जांभळेवाडी
ता शिराळा जि सांगली

जाहीर नोटीस देणेत येते की वरील अर्जदार रामचंद्र यशंवत ढेबे रा. जांभळेवाडी ता. शिराळा जि. सांगली यांनी अर्ज करून आई कै 'येसाबाई यशवंत ढेबे यांचा मृत्यू दिनांक १७/२/२०१६ रोजी मौजे जांभळेवाडी ता. शिराळा जि.सांगली येथे झाला असुन त्याची नोंद होणेकामी या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी कायदा कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केला असून सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा सदर अर्जाच्या सुनावणी कामी पुढील नेमलेली तारीख २/४/२०२६ रोजी सकाळी ११–०० वा.या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे कागदपत्रासोबत मांडावे सदर सुनावणी पर्यंत कोणचीही हरकत न आलेस सदर अर्जास कोणचीही हरकत नसल्याचे समजुन पुढील यथोचित आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/३/२०२६ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

ठिकाण – ईश्वरपूर
दिनांक १८/३/२०२६

**सही/–**
**(श्रीनिवास अर्जुन)**
**उपविभागीय दंडाधिकारी**
**वाळवा विभाग ईश्वरपूर**

# बौध्द विहार उभारण्यासाठी चौदा वर्षा पासूनची प्रतीक्षा

## मंदिर समिती कर्मचाऱ्यांना जागा दिल्यास अमरण उपोषण

**पंढरपूर/प्रतिनिधी:–**




चौदा वर्षा पासून यमाई तलावा नजिक असणाऱ्या नगरपरिषदेच्या जागेवर बुध्द विहार उभारण्याची आमची मागणी आहे. याबाबत वारंवार पाठपुरावा करून, नगरपरिषदेने ठराव करून देखील आम्हाला न्याय मिळाला नाही. तर दुसरीकडे श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना मात्र तातडीने घर बांधणीसाठी जागा देण्यात येणार असल्याची माहिती असून प्रशासनाच्या या कारभारा विरोधात दि.२० मार्च रोजी अमरण उपोषण करण्यात येणार असल्याची घोषणा बुध्द विहार कृती समितीचे अध्यक्ष सिध्दार्थ जाधव यांनी पत्रकार परिषदेमध्ये केली.

याबाबत माहिती देण्यासाठी पंढरपूर नगरपरिषद प्रस्तावित बुध्दभूमी निर्माण कृती समितीच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यास आप्पासाहेब जाधव, प्रशांत लोंढे, रवींद्र शेवडे, स्वप्नील गायकवाड, अमित कसबे, महेश मोटे, योगेश जाधव, अमर फडतरे, दीपक साबळे, रूपशे वाघमारे आदी उपस्थित होते.

येथील यमाई तलावा नजिक पंढरपूर नगरपरिषदेची दहा एकर जागा असून या जागेवर बुध्द विहार उभारणीची मागणी २०१२ सालापासून विविध संघटनेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. सदर जागा देण्या विषयीचा ठराव देखील नगरपरिषदेने केला आहे. या ठिकाणी बोधी वृक्षाचे रोपण करण्यात आले असून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पन्नास कोटी रूपये देण्याची घोषणा देखील केली आहे. २०१५ साली सदर जागेची मोजणी करण्यात आली होती. तरीही अद्याप त्याचा नकाशा तयार करण्यात आला नाही. आमदार समाधान आवताडे यांनी विधानसभेत दोनवेळा या विषयी प्रश्न उपस्थित केला होता. तरीही अधिकारी या विषयी दिशाभूल करीत असल्याचा आरोप केला. सदर जागा देण्याबाबत गेल्या चौदा वर्षा पासून टोलवाटोलवी केली जात असल्याचा अनुभव आम्हाला येत असल्याची खंत जाधव यांनी व्यक्त केली.

तर दुसरीकडे २०२४ साली श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या घरांसाठी सदर जागा देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. आमच्या बाबतीत उदासिनता तर मंदिर समितीच्या बाबत अधिकाऱ्यांनी ऐवढी तत्परता का दाखवली असा प्रश्न जाधव यांनी उपस्थित केला. सदर जागा बुध्द विहारासाठीच राखीव ठेवावी, मंदिर समिती कर्मचारी अथवा इतर कोणास राहण्यास देण्याचा आमचा कडाडून विरोध असून यासाठी दि.२० मार्च रोजी तहसील कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा सिध्दार्थ जाधव यांनी दिला.

# ७५ वर्षाच्या आजोबांची विटा बस स्थानकात पहाटेच्या वेळी धावपळ

## कंट्रोल केबिनला विनंती केली तरीही... कुणी मदतीस आले नाही



**विटा/प्रतिनिधी:–**
सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील ( नागनाथ नगर, नागेवाडी चे) एक आजोबा हे मुंबईला आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले होते. भेटून ते आपल्या गावी परत जाण्यासाठी मुंबई – आटपाडी ही बस त्यांनी मुंबई येथून पकडली आणि त्या एस.टी.बस ने ते येत होते. तेव्हा याच आजोबांना सातारा बसस्थानकात आल्यानंतर लघुशंकेसाठी जायचे होते. ते कंडक्टरला व एस.टी.बस च्या वाहकाला सांगून जायचे या हेतूने ते आजोबा एस.टी.बस मधून खाली उतरले. तेव्हा एसटीच्या आजूबाजूला सातारा बस स्थानक वर चालक व कंडक्टर त्यांना दिसून आले नाही. परंतु लघुशंकेसाठी जाणेच गरजेचे होते या अनुषंगाने आजोबा लघुशंकेसाठी गेले. तोवर चालक –वाहक यांनी एसटी बसमध्ये सर्व प्रवासी आले का, याची खातरनामा न करता सातारा एसटी डेपोतून सरळ एसटी आटपाडीकडे रवाना केली.

मात्र बिचारे आजोबा सातारा बस स्थानकात एसटी शोधू लागले. प्लॅटफॉर्म वरती एसटी बघितली तर आजोबांना एसटी कुठेच दिसून आली नाही. त्यांनी थेट सातारा कंट्रोल कॅबिन येथे चौकशी केली त्यावेळी बस गेली असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हा ७५ वर्षाचा आजोबा आपली बॅग आणि पिशवी याचा शोध घेण्यासाठी आटपाडी कडे गेले. या आजोबांची आपले साहित्या मिळवण्यासाठी विटा बसस्थानकात पहाटे धावपळ सुरू होती.

सातारा बस स्थानकावर आजोबांनी त्या अधिकाऱ्यांना सांगितले, साहेब, माझी पिशव्या बॅग व अन्य साहित्य त्या बसमधून पुढे गेले आहे. विनंती करतो साहेब तेवढे कुठेतरी कराडमध्ये बस स्थानक मध्ये उतरून घ्यायला सांगा. यावेळी सातारा कंट्रोल कॅबिन मधून त्या आजोबांना सांगण्यात आले की, कराड कंट्रोलच्या केबिनला तुम्ही तिथे जावा. मात्र आजोबा क्षणभर न थांबता लगेच दुसऱ्या एसटीने त्यांनी कराड बस स्थानक गाठले. तिथे कंट्रोल कॅबिनला पिशव्यांबाबत विचारले, माझी बॅग पिशव्या चालक वाहक आणि इथं जमा केल्या का ? सातारा कंट्रोल कॅबिनमधून तुम्हाला फोन आला होता का ? असे कराड कंट्रोल केबिनच्या अधिकारी कर्मचारी यांना विचारले असता ते नाही म्हणाले. लगेच ताबडतोब आजोबा कराड बस स्थानकातून विटा बस स्थानकात आले. विटा बस स्थानक कंट्रोल केबिनमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी तिथे होते. त्यांनी झालेली घटना अधिकार्यांना सांगितली. व विनंती केली की, साहेब, तुम्ही आटपाडी डेपोला माझं साहित्य पिशव्या उतरून घ्यायला सांगा. मात्र तेथील एका अधिकार्याने, आमच्याकडे आटपाडी आगार डेपोचा नंबर नाही, असे आजोबांना उत्तर दिले.

आजोबांनी सातारा, कराड, विटा कंट्रोल केबिनला विनंती करूनही त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. काही प्रवाशांनी या आजोबांना मदत करण्यासाठी प्रयत्न केला. मात्र शेवटी आजोबा कोणाच्यातरी सल्ल्याने सकाळी येणाऱ्या ६.३० च्या कराड – सोलापूर या एसटी बसने आटपाडीकडे रवाना झाले. एका सामाजिक कार्यकर्त्यांने आटपाडी एसटी डेपोला कंट्रोल केबिनला फोन करून सदर एका आजोबांची पिशवी बॅग व अन्य साहित्य विसरले आहे, असे सांगितले. यावर आटपाडी डेपो आगार व्यवस्थापक अधिकाऱ्यांनी, मुंबई – आटपाडी एसटी बस आटपाडी डेपोत आली तर आम्ही तुमचे सामान असेल बस मधून उतरून घेऊ, असे सांगितले. बॅग सापडेल की नाही या काळजीत आजोबांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. केवळ या आजोबांचे वय ७५. या वयात सुद्धा त्यांना सातारा, कराड, विटा, आटपाडी या आगार डेपोत धावपळ करावी लागली. मात्र आटपाडी येथील एस. टी. अधिकारी वगळता आजोबांना कोणीही मदत केली नाही. शेवटी प्रवासीच प्रवाशांच्या कामी आले. त्यामुळे संबंधित विटा आगार डेपो यांनी प्रवाशांना सहकार्य करणे हे आपले कर्तव्य आहे, असे समजून वागले पाहिजे, अशी चर्चा विटा बस स्थानकावरील प्रवाश्यांतून सुरू होती.

# मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना प्रभावीपणे राबवावी

## जिल्हाधिकारी अशोक काकडे



**सांगली/प्रतिनिधी:–**
जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना प्रभावीपणे राबवावी. त्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने जलसंपदा, जिल्हा परिषद, कृषि अशा अन्य संलग्न विभागांशी सांगड घालावी. जिल्हा विकास आराखड्यांतर्गत देशाच्या स्वातंत्र्यप्राप्ती शताब्दी वर्ष २०४७ पर्यंत टप्पानिहाय नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आज येथे दिल्या.

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या या बैठकीस सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विनोद राठोड,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार, जिल्हा जलसंधारण अधिकारी बा. वि. आजगेकर, जिल्हा विकास आराखड्याचे समन्वयक चंद्रकांत पाटील यांच्यासह मच्छिमार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अशोक काकडे म्हणाले, मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना ही मत्स्यव्यवसाय क्षेत्रात क्रांती घडवणारी योजना आहे. या योजनेतून कष्टकरी मच्छिमार व मत्स्यकास्तकार यांना आधुनिक तंत्रज्ञानासह पायाभूत सुविधा व आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या अनुषंगाने मत्स्य बीज निर्मिती व संगोपन, संवर्धन, मासळी उतरवण्याची ठिकाणे, मासे सुकविणे, मत्स्यबाजार, नदी पुनर्भरण, कोल्ड स्टोरेज आदिंचा विचार करून तपशीलवार कृती आराखडा तयार करावा. विविध योजनांच्या समन्वयाने स्थानिक मच्छिमारांना रोजगाराच्या संधी निर्माण होऊन मच्छिमारांचे आर्थिक उत्पन्न वाढेल. तसेच, त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी मूलभूत सुविधा व आवश्यक साधनसामग्री याबाबतचे नियोजन करावे. यासाठी अनुभवाला शास्त्रीय जोड द्यावी, असे त्यांनी सूचित केले.

या बैठकीत जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मत्स्य उत्पादन वाढ, जलस्रोतांचा प्रभावी वापर, मत्स्यपालनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब,तसेच लाभार्थ्यांना योजनांचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

# खरेदी करा आणि लगेच जिंका! माळेगावात एस.पी. सराफची धमाकेदार 'स्क्रॅच अँड विन' योजना

## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांसाठी खास भेट; वर्षभर मिळणार बक्षिसांचा थरार

**बारामती/प्रतिनिधी:–**
सणासुदीच्या आनंदात ग्राहकांना आणखी आनंदाची जोड देत माळेगावातील एस.पी. सराफ प्रायव्हेट लिमिटेडने 'स्क्रॅच अँड विन' या नावीन्यपूर्ण योजनेची घोषणा केली आहे. गुढीपाडव्याच्या शुभप्रसंगी सुरू करण्यात आलेली ही योजना ग्राहकांमध्ये उत्सुकता निर्माण करणारी ठरत आहे.

माळेगावातील एस.पी. सराफ ही केवळ सराफ पेढी नसून विश्वास, गुणवत्ता आणि नातेसंबंध यांची परंपरा जपणारे नाव म्हणून ओळखली जाते. वर्षानुवर्षे ग्राहकांना पारदर्शक सेवा देत या पेढीने बाजारात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळेच ग्राहक आणि एस.पी. सराफ यांच्यात एक जिव्हाळ्याचे नाते तयार झाले आहे.

याच नात्याला अधिक घट्ट करण्यासाठी आणि ग्राहकांच्या खास क्षणांना विशेष बनवण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. ग्राहकांचा किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस अशा महत्त्वाच्या दिवशी एस.पी. सराफ येथे




खरेदी केल्यास ग्राहकांना स्क्रॅच कुपन दिले जाणार आहे. या कुपनमधून तत्काळ बक्षिस जिंकण्याची संधी मिळणार असून, ९९९ रुपयांपर्यंतची रक्कम जिंकण्याचा आनंद ग्राहकांना घेता येणार आहे.

विशेष म्हणजे, ही योजना वर्षभर सुरू राहणार असल्याने ग्राहकांना कोणत्याही दिवशी या संधीचा लाभ घेता येणार आहे. खरेदीसोबतच बक्षिस जिंकण्याची संधी मिळाल्याने ग्राहकांसाठी हा अनुभव अधिक रोमांचक ठरणार आहे.

एस.पी. सराफ प्रायव्हेट लिमिटेडने नेहमीच ग्राहककेंद्रित उपक्रम राबवले असून, ही योजना देखील त्याच परंपरेचा भाग असल्याचे बोलले जात आहे. सणाच्या निमित्ताने ग्राहकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा हा प्रयत्न असल्याची भावना व्यक्त होत आहे.

> ग्राहकांचा आनंद आणि समाधान हेच आमच्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे. त्यांच्या खास दिवसांना अधिक खास बनवण्यासाठी 'स्क्रॅच अँड विन' योजना सुरू केली आहे. सर्वांनी या संधीचा जरूर लाभ घ्यावा.
> – शिवाजी क्षीरसागर , संचालक –एस पी सराफ प्रायव्हेट लिमिटेड

# धर्मवीर संभाजी राजे यांना साताऱ्यात अभिवादन

## बलिदान दिनानिमित्त शहरातून निघाली मूकपदयात्रा



**सातारा/प्रतिनिधी:–**
धर्मासाठी आहुती देणाऱ्या धर्मवीर संभाजी राजे यांच्या बलिदान दिनानिमित्त सातारा शहरात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांचे वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते .या कार्यक्रमात सकाळी छत्रपती संभाजीराजे यांना अभिवादन आणि सायंकाळी बलिदान दिनानिमित्तगोलबाग राजवाडा ते पोळी नाका अशी मूक पदयात्रा काढण्यात आली होती

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीमध्ये छत्रपती संभाजी राजे यांनी धर्म रक्षक संभाजी म्हणून मोठे योगदान दिले आणि धर्म रक्षणासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. फाल्गुन अमावस्या हा दिवस इतिहासामध्ये छत्रपतीसंभाजी महाराज यांचा बलिदान दिन म्हणून साजरा केला जातो. सातारा शहरामध्ये शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या वतीने या दिवसाच्या आधी पंधरा दिवस बलिदान मास या नावाने तो दिवस ओळखला जातो .प्रतिष्ठानच्यावतीने साताऱ्यात सकाळी नऊ वाजता उपनगराध्यक्ष एडवोकेट दत्ता बनकर सातारा पंचायत समितीचे सभापती महेश गाडे यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला अभिषेक करून अभिवादन करण्यात आले .तसेच श्रीक्षेत्र वढू तुळापूर तालुका शिरूर जिल्हा पुणे येथून आणलेल्या धर्मवीर ज्योतीचे साताऱ्यात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या कार्यकर्त्यांनी या ज्योतीचे पोवई नाकाशिवतीर्थ येथे स्वागत करून या ज्योतीला अभिवादन केले .सातारा पालिकेसमोरील नाना नानी पार्क मध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचे तैलचित्र उभारण्यात आले आहे .या प्रतिमेला नगराध्यक्ष अमोल मोहिते उपनगराध्यक्ष एडवोकेट दत्ता बनकर नियोजन सभापती अशोक शेडगे, नगरसेविका हेमलता येवले, नगरसेविका अनिता फरांदे,नगरसेवक सुशांत महाजन यांच्या उपस्थितीत पुष्प चक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले .सायंकाळी राजवाडा गोलबाग ते पवई नाका छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त मूक पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते .या पदयात्रेमध्ये सुमारे २०० हून अधिक कार्यकर्ते सहभागी झाले होते .विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादनकरून या बलिदान दिनाचे स्मरण करण्यात आले .

# जाहीर/पेपर नोटिस

## कल्याण येथील मे.दिवाणी न्यायाधीश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात,कल्याण

**दिवाणी चौकशी अर्ज क्र: १०९८/२०२४**

श्री. सचिन अभिमन्यू भोईर, | – अर्जदार

**विरुद्ध**

श्री. कैलास अभिमन्यू भोईर, व इतर | – गैरअर्जदार

वरील अर्जदार यांच्या यांचे वडील श्री. अभिमन्यू नामदेव भोईर यांचा दि.१२/०८/२०२३ रोजी कल्याण येथे मयत झाले त्यांच्या नावे असलेली मिळकत खालील प्रमाणे;

| अनू. क्र. | मिळकतीचे वर्णन | पत्ता | क्षेत्र (स्के. फुट) | खरेदी खत क्रमांक व तारीख | मूल्यांकन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सदनिका क्र. २०१ | सदनिका क्र. २०१, दूसरा मजला, नामदेव संकुल (फ्लॉवर व्हॅली) बिल्डिंग क्र. १०, ई टाइप, मौजे–गांधारे येथील सर्वे क्र. ४२ ही. न. ५ (पै) ता–कल्याण जि–ठाणे | ५६६ चौ. फुट (बांधीव) | २७३७/२०१२ २८/०३/२०१२ | ४०,००,०००/– |
| २ | सदनिका क्र. २०२ | सदनिका क्र. २०२, दूसरा मजला, नामदेव संकुल (फ्लॉवर व्हॅली) बिल्डींग क्र. १०, ई टाइप, मौजे–गांधारे येथील सर्वे क्र. ४२ ही. न. ५ (पै) ता–कल्याण जि–ठाणे | ५७२ चौ. फुट (बांधीव) + १६१ चौ. फुट टेरेस | २७३८/२०१२ २८/०३/२०१२ | ५१,००,०००/– |
| ३ | दुकान क्र. १ | दुकान क्र. १, तळ मजला, नामदेव संकुल (फ्लॉवर व्हॅली) बिल्डींग क्र. १०, ई टाइप, मौजे– गांधारे येथील सर्वे क्र. ४२. ही. न. ५ (पै) ता– कल्याण जि–ठाणे | १७२.७५ चौ.फुट (कारपेट) | ६३/२००७ ०४/०१/२००७ | १५,००,०००/– |
| ४ | दुकान क्र.२ | दुकान क्र. २, तळ मजला, नामदेव संकुल (फ्लॉवर व्हॅली) बिल्डींग क्र. १०, ई टाइप, मौजे– गांधारे येथील सर्वे क्र. ४२. ही. न. ५ (पै) ता– कल्याण जि–ठाणे | २४०.३३ चौ. फुट (कारपेट) | ६५/२००७ ०४/०१/२००७ | १९,००,०००/– |
| ५ | दुकान क्र.३ | दुकान क्र. ३, तळ मजला, नामदेव संकुल (फ्लॉवर व्हॅली) बिल्डींग क्र. १०, ई टाइप, मौजे– गांधारे येथील सर्वे क्र. ४२. ही. न. ५ (पै) ता– कल्याण जि–ठाणे | २०३ चौ.फुट (कारपेट) | ६४/२००७ ०४/०१/२००७ | १६,००,०००/– |
| ६ | दुकान क्र.४ | दुकान क्र. ४, तळ मजला, नामदेव संकुल (फ्लॉवर व्हॅली) बिल्डींग क्र. १०, ई टाइप, मौजे– गांधारे येथील सर्वे क्र. ४२. ही. न. ५ (पै) ता– कल्याण जि–ठाणे | २७६ चौ.फुट (कारपेट) | ६६/२००७ ०४/०१/२००७ | २१,००,०००/– |
| ७ | कार पार्किंग क्र.७ व ८ | कार पार्किंग क्र.७ व ८, तळ मजला, नामदेव संकुल (फ्लॉवर व्हॅली) बिल्डींग क्र. १०, ई टाइप, मौजे–गांधारे येथील सर्वे क्र. ४२ ही. न. ५ (पै) ता–कल्याण जि–ठाणे | २३० चौ.फुट (कारपेट) (बांधीव) | ८९१/२००९ ११/०२/२००९ | १८,००,०००/– |
| | | | | एकूण | १,८०,००,०००/– |

आणि

१. मौजे बापगाव ता. भिवंडी, जि–ठाणे येथे सर्वे क्र. ९८ हिस्सा नं. १/अ ०–५८–४० ही बिगर शेती जमीन मालकीची होती सदरहू जमीन ही अर्जदार व श्री अभिमन्यू नामदेव भोईर यांनी मा. सह–जिल्हा निबंधक भिवंडी यांच्या कडे रजिस्टर विकसित करार क्र. २७८५/२०१९ दि. ०२/०४/२०१९ द्वारे विकसित करावयास दिली होती सदरहू मिळकत विकसित झाल्यानंतर त्याचा मोबदला म्हणून खालील मिळकत सह हिस्सेदार यांनी अर्जदार व श्री अभिमन्यू भोईर यांना दि. ०७/०१/२०२० रोजीच्या मा. सह–जिल्हा निबंधक भिवंडी यांच्या कडे नोंदणीकृत मुखत्यार पत्र क्र. १६८/२०२० अन्वये खालील मिळकतीचे हक्क दिलेले आहेत सदरहू मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे;

| अनू. क्र. | इमारत | विंग | मजला | सदनिका दुकान क्र. | क्षेत्र (चौ. फुट) | अंदाजे (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | A | १ | दूसरा | २०३ सदनिका | ६३० | १३,००,०००/– |
| २ | A | १ | तिसरा | ३०४ सदनिका | ५७० | १२,००,०००/– |
| ३ | A | ३ | दूसरा | २०२ सदनिका | ९३० | २०,००,०००/– |
| ४ | A | ४ | पहिला | १०२ सदनिका | ६४५ | १४,००,०००/– |
| ५ | B-1 | -- | पहिला | १०६ सदनिका | ३७० | ८,००,०००/– |
| ६ | A | १ | पहिला | १०१ ऑफिस | ४४० | ९,००,०००/– |
| ७ | A | १ | पहिला | १०५ ऑफिस | ५७५ | १२,००,०००/– |
| ८ | A | १ | तळ | ०५ दुकान | ९०५ | २२,००,०००/– |
| ९ | A | ४ | तळ | २४ दुकान | ३२५ | ८,००,०००/– |
| १० | A | -- | तळ | ००६ दुकान | ३२० | ८,००,०००/– |
| ११ | A | -- | तळ | ०११ दुकान | २५५ | ७,००,०००/– |
| १२ | B-1 | -- | तळ | ००२ दुकान | ३३५ | ८,००,०००/– |
| | | | | **एकूण** | **६३००** | **१,३९,००,०००/–** |

२. मौजे भोसे, ता. महाबळेश्वर, जि सातारा येथील मिळकत स. नं. ३१ यामधील प्लॉट नं. ४१ याचे एकूण क्षेत्र ५९२.७१ चौ. मी. याचे ६३८० चौ. फुट जागा व त्यामधील आरसीसी इमारत याचे बांधकाम क्षेत्र २७२.६७ चौ. मी. याचा मालमत्ता क्र. ७६० असा आहे. मूल्यांकन रु. २,२५,००,०००/– (रु. दोन करोड पंचवीस लाख फक्त).

३. श्री. अभिमन्यू नामदेव भोईर यांचे बँक खात्याचा तपशील खालील प्रमाणे;

| अनू. क्र. | बँकेचे नाव | बचत खाते क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पंजाब नॅशनल बँक शाखा कल्याण | २३२९०००२१०००६७२८६ | ६,१७,२७८.५८/– |
| २ | कॅनरा बँक कल्याण | ०२३०१०१०९०१०७ | ९,२६,९५७.३३/– |
| | | **एकूण** | **१५,४४,२३५.९१/–** |

वरील मिळकती बाबत अर्जदार आणि गैर अर्जदार हेच फक्त मयताचे कायदेशीर वारस असले बाबत दाखला मिळणे कामी मे. न्यायालयात अर्ज केला असून सदर मिळकतीत अर्जदारांच्या व्यतिरिक्त कोणाचे हक्क, अधिकार, हित संबंध अगर हरकत असल्यास किंवा अर्जदार वारस नाहीत असा दावा असल्यास सदरहू नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत आपली लेखी हरकत मा. न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत नसल्यास अर्जदार यांच्या विनंती नुसार वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिली

**सही/–**
**लिपिक**

**सही/–**
**सहाय्यक अधिक्षक (न्यायिक)**
**दिवाणी न्यायालय व.स्तर**
**कल्याण.**

# वडगाव(ज.स्वा.)येथील पुलाच्याकामाची बाळासाहेब पाटील यांनी केली पाहणी



**कराड/प्रतिनिधी : –**
राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री, सह्याद्रि सहकारी कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी नुकतीच वडगाव (ज.स्वा.) ता. खटाव येथील येथे उभारलेल्या उंच पुलाच्या कामाची पाहणी केली.

माजी आमदार बाळासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून, अर्थसंकल्पीय निधी सन २०२३–२४ मधून, वडगाव (ज.स्वा.) ता. खटाव येथील रस्ता ग्रा.मा. २७९ वर नांदणी नदीवर मोठा उंच पूल बांधण्यासाठी ८ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता. सदरचा पूल सातारा व सांगली या दोन जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वपूर्ण पूल असून, सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील वांझोळी रहाटणी, वडगाव (ज.स्वा.) आणि सांगली जिल्ह्यातील हिंगणगाव बुद्रुक, शाळगाव, रायगाव येडे, उपाळे तसेच कडेपूर इत्यादी गावांना दळणवळणासाठी, शेतमाल ने–आण करण्यासाठी अत्यंत सोयीचा ठरणार आहे. सदर पुलाचे काम गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेमध्ये पुर्ण करावे अशा सूचना माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी शाखा अभियंता सुळे आणि ठेकेदार पांचारिया यांना दिल्या.

याप्रसंगी सह्याद्रि कारखान्याचे संचालक संतोष घार्गे, सोसायटीचे चेअरमन प्रकाश घार्गे, सुरेश कदम, विकास शिंदे, जितेंद्र घार्गे, संदीप घार्गे, वर्धन घार्गे, संतोष घार्गे, संतोष जाधव (खराडे), विनोद जाधव, अशोक देटके (निगडी) सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता दत्तात्रय सुळे, ठेकेदार पांचारीया, डे. सिव्हिल इंजिनियर प्रताप चव्हाण, इरिगेशन संपर्क प्रमुख आर. जी. तांबे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# नानासाहेब महाडिक इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये आरोग्य शिबिर उत्साहात

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**
श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था संचलित नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पेठ येथे कोयना सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल आणि आकाशदीप नेत्रालय यांच्या सहकार्याने संकुलातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला विद्यार्थी व स्टाफ यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन संस्थेचे सचिव राहुल महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून रक्त तपासणी, शुगर तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, ईसीजी तसेच नेत्र तपासणी अशा विविध आरोग्य तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत करण्यात आल्या. या कार्यक्रमास कार्यकारी संचालक डॉ. महेश जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील आणेकर, संस्थेचे संचालक राहुल चिटणीस यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी बोलताना राहुल महाडिक म्हणाले, शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचे आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. अशा आरोग्य तपासणी शिबिरांमुळे वेळेवर आजारांचे निदान होऊन योग्य उपचार घेण्यास मदत होते. संस्थेमार्फत भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

कार्यकारी संचालक डॉ. महेश जोशी यांनी, विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. शिक्षणासोबत आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येत असल्याचे सांगितले. या शिबिरामुळे विद्यार्थी व कर्मचारी यांना तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाले. यावेळी उपस्थित डॉक्टर्स, संपर्क अधिकारी व सर्व वैद्यकीय स्टाफ यांना संस्थेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. प्रा. सुरेखा नांगरे यांच्यासह सर्व स्टाफ यांनी संयोजन केले. विभागप्रमुख व स्टाफ उपस्थित होते.

# श्रावस्ती बनसोडेचे एनएमएमएस परीक्षेत यश

**पाटण/प्रतिनिधी : –**
शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस. या शिष्यवृत्ती परीक्षेत येथील कै. ज्ञानोजीराव साळुंखे विद्यालयातील कुमारी श्रावस्ती संदेश बनसोडे (इ. ८ वी) हिने उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिने १३२ गुण मिळवून वर्गात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



हे यश मिळवण्यासाठी तिने सातत्याने अभ्यास केला. तसेच शाळेतील मुख्याध्यापक भागवत देसाई यांच्या नियोजनाखाली सर्व शिक्षकांनी प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एकूण ६६ विद्यार्थ्यांपैकी ४९ विद्यार्थी पात्र झाले असून, १०० पेक्षा जास्त गुण मिळवणारे १७ विद्यार्थी आहेत. यश मिळवणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या शाळेच्यावतीने अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सूचना**

अ.उ.दा. संवसु मंडल, कराड अंतर्गत **"Tender for the work of Counter Poise & Patti Earthing for 220kV and 110kV Lines under LMSD Vishrambag & Borgaon under EHV O&M Division, Sangli."** कामाकरिता नामांकित कंत्राटदारांकडून ई–निविदा मागविणेत येत आहेत. निविदा **आर.एफ.एक्स. क्रमांक ७०००३९३७०.** नोंदणीकृत कंत्राटदार विहित नमुन्यातील कोरी निविदा प्रत **http://srmetender.mahatransco.in** या वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन घेवू शकतील.

**१) कोरी निविदा डाऊनलोड करणेची मुदत :–** १९.०३.२०२६ ते ०३.०४.२०२६
**२) निविदा स्वीकारणेची अंतिम तारीख व वेळ :–** ०३.०४.२०२६ सकाळी १०.०० वाजेपर्यंत. **३) निविदा उघडणेची तारीख व वेळ :–** ०६.०४.२०२६ सकाळी १०.०० वाजता टेक्निकल बीड व ०६.०४.२०२६ दुपारी १५.०० वाजता कमर्शिअल बीड. (उपलब्धतेनुसार)

जादा माहितीसाठी **www.mahatransco.in** या वेबसाईटवर पहावे. कोणतेही कारण न दाखविता एखादी अथवा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**अधीक्षक अभियंता,**
**अउदा संवसु मंडल, कराड**

# जाहिर प्रसिद्धी

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
क्र. मह/वतन/कावि–२०६/२०२६
सातारा, दि १६/०३/२०२६

तमाम लोकांस कळविणेत येते कि खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीच्या (इनामवर्ग ६ ब) मिळकती हया श्रीमती कोमल लहू तौर, श्री.नितेश वसंत वाडते, श्रीमती रेणूका गणेश निशानदार, श्रीमती शितल अनिस ओवाळ रा.तांबवे ता.कराड, जि.सातारा यांच्या हिश्याचे मालकी व ताबे वहिवाटीच्या असून सदर मिळकत त्यांनी श्री.हिंदूराव यशवंत पाटील रा.तांबवे ता.कराड जि.सातारा यांना शेती प्रयोजनार्थ विक्री करण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. त्यानुसार त्यांचेबरोबर बोलणी चालू आहे सदर मिळकती पूर्णपणे निर्वेध व निर्जोखमी असल्याचा भरवसा त्यांनी दिलेला आहे. सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही बक्षीस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी चोळीबांगडी खरेदी साठेखत, करार–मदार, कुळ वहिवाट, इसारपावती इ. कोणत्याही स्वरुपात हक्कसंबंध असल्यास किंवा कोणाची तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी कार्यालय सातारा/तहसिलदार कराड यांचे कार्यालयात मूळ कागदपत्रानिशी खात्री पटवून दयावी अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरचा व्यावहार पूर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही हरकत अगर तक्रार चालणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शासन परिपत्रक नंबर– इब्ल्यूटीएन १०९९/सीआर/२२९/ल–४, दिनांक १० मार्च २००० मधील मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहिशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या व मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. मह/२/वतन/आरआर/७५१/०९ दिनांक–२९/०९/२००९ चे सूचनेनुसार सदर गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन मूळ मालक व नियोजित खरेदीदार यांचेमध्ये ठरलेल्या किंमतीस खरेदी घेणेस इच्छूक असल्यास अशा व्यक्तींनी लेखी स्वरुपात १५ दिवसाच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय सातारा/तहसिलदार कराड यांचे कार्यालयास लेखी कळवावे.

**परिशिष्ट–**
**गावाचे नांव–मौजे तांबवे**
**तालुका–कराड**
**जिल्हा–सातारा**

| ग.नं. | पोट हिस्सा | जमिनीचे एकुण क्षेत्र | | जमिनीचे विक्री करावयाचे क्षेत्र | | आकार | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हे | आर | हे | आर | रुपये | पैसे |
| ८७ | – | ० | ४३ | ० | २१.५० | ६ | ३१ |

**गट नंबर ८७ च्या लगतच्या चतुः सीमा (पंचनाम्यावरून)**

| दिशा | लगतचे ग. नं./ सिमा |
|---|---|
| पूर्व | रस्ता किरपे–तांबवे |
| पश्चिम | तात्यासो विठ्ठल वाडते यांची मिळकत |
| दक्षिण | प्रविण वसंत वाडते यांची मिळकत |
| उत्तर | लतिका पांडूरंग वाडते यांची मिळकत |

**सही/–**
**(विक्रांत चव्हाण)**
**उपजिल्हाधिकारी (महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा**

# झेडपीच्या ४५.४० कोटींचा अर्थसंकल्पास प्रशासकीय मान्यता

**सातारा/प्रतिनिधी:-**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक नोटीस कालावधी उपलब्ध न झाल्याने, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सातारा जिल्हा परिषदेच्या ४५ कोटी ४० लाख रुपयांच्या अर्थसंकल्पास बुधवारी (दि. १८) प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीनंतर होणाऱ्या पहिल्या सर्वसाधारण सभेत या अर्थसंकल्पाला अंतिम मंजूरी दिली जाणार आहे.

सातारा जिल्हा परिषदेचे सदरचे बजेट मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्याकडे सुपूर्द केले. त्यानंतर त्यांनी ते सभागृहासमोर सादर केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी आर. एन. गावडे, प्रकल्प संचालक विश्वास सिद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, ग्रा. पं. उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे, बांधकाम अभियंता मोहसिन मोदी, अमर नलवडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी अंनिस नायकवडी, माध्यमिक शिक्षणाधिकारी धनंजय चोपडे, समाजकल्याण अधिकारी विद्यानंद चल्लावार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विनोद पवार, जिल्हा कृषी विकास अधिकारी गजानन ननावरे आदींची यावेळी उपस्थिती होती.

सन २०२६-२७ साठी जिल्हा परिषदेचा एकूण अर्थसंकल्प ६४ कोटी ३२ लाख रुपयांचा असून, त्यामध्ये महसुली जमा ४५.४० कोटी व भांडवली जमा १८.९२ कोटी रुपयांचा समावेश आहे. याच प्रमाणे महसुली व भांडवली खर्च ठेवण्यात आला असून १ लाख रुपयांची शिल्लक राखण्यात आली आहे. दरम्यान, सन २०२५-२६ च्या सुधारित अंदाजपत्रकात महसुली जमा ११३.१२ कोटी ६७ हजार रुपये व भांडवली जमा २०.९२ कोटी रुपये गृहीत धरून १ लाख रुपयांची शिल्लक ठेवण्यात आली होती.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम, १९६६ नुसार निश्चित कालावधीत अर्थसंकल्प मंजूर होणे अपेक्षित असते. मात्र, शुक्रवारी (दि. २० मार्च रोजी) अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक होणार असल्याने आवश्यक १२ दिवसांचा नोटीस कालावधी मिळू शकला नाही. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे याशनी नागराजन यांनी यावेळी सांगितले. तसेच, नव्याने स्थापन होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत हा अर्थसंकल्प अवलोकनार्थ सादर केला जाणार असून त्यानंतर अंतिम मंजुरी दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी राहुल कदम यांनी सर्वांचे आभार मानले.

पदाधिकारी मानधन : अध्यक्ष-उपाध्यक्षांसाठी २.४० लाख, सभापती-उपसभापतींसाठी ३२.७६ लाख; सदस्य प्रवास भत्त्यासाठी स्वतंत्र तरतूद. शिक्षण विभाग : गुणवत्ता विकास, क्रीडा स्पर्धा, प्रज्ञाशोध परीक्षा, मॉडेल स्कूल व शाळा दुरुस्तीसाठी निधी. बांधकाम विभाग : ग्रामीण रस्ते, इमारती, निवासस्थाने व विश्रामगृह दुरुस्तीसाठी तरतूद. आरोग्य विभाग : औषध पुरवठा, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वीज देयक व सार्वजनिक आरोग्य योजना. कृषी व पशुसंवर्धन : ताडपत्री, एचडी पाईप, यांत्रिकीकरण, शेळी गट वाटप व पशुवैद्यकीय सेवा समाजकल्याण : जोडरस्ते, समाजमंदिरे, दिव्यांग योजना व घरकुलासाठी निधी. महिला व बालकल्याण : संगणक प्रशिक्षण, महिलांसाठी व्यवसायिक प्रशिक्षण, सायकल योजना व अंगणवाडी साहित्य.तरी, नियमांनुसार वेळेत मंजुरी शक्य नसल्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली असली, तरी सर्व तरतुदी नव्या जिल्हा परिषदेच्या पहिल्या सभेत अंतिम मान्यतेसाठी मांडण्यात येणार आहेत.

**सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रकीय तरतूद (रुपये लाखात)**

| | |
|---|---|
| १ - मानधन - ८० | १३ - समाजकल्याण विभाग - ३२२.०० |
| २ - सामान्य प्रशासन - १५०.०० | १४ - समाजकल्याण विभाग ५ टक्के दिव्यांग - ८२.०० |
| ३ - शिक्षण विभाग - १८०.०० | १५ - सामुहिक विकास - २.०० |
| ४ - शिक्षण प्राथ देखभाल व दूरुस्ती - ८१.०० | १६ - संकीर्ण (२०५३/२२३५/३६०४) - ६७.०० |
| ५ - बांधकाम विभाग - ८००.०० | १७ - संकीर्ण ग्रामपंचायत - १७७४.०० |
| ६ - लघु पाटबंधारे विभाग - ४०.०० | १८ - संकीर्ण अर्थ विभाग - ३५५.०० |
| ७ - आयुर्वेद - २०.०० | १९ - महिला बाल कल्याण - १६१.०० |
| ८ - आरोग्य - १४०.०० | २० - एकात्मिक बाल विकास प्रकलप - १४.०० |
| ९ - सार्व. आरोग्य अभियांत्रिकी - ५०.०० | **एकूण - ४५ कोटी ४० लाख रुपये.** |
| १० - कृषि विभाग - ११०.०० | - भांडवली - १८९२.०० |
| ११ - पशुसंवर्धन विभाग - ११०.०० | **एकूण - ६४ कोटी ३२ लाख रुपये** |
| १२ - वने - २.०० | |




# सातारा शहरात अवैध विदेशी दारू वाहतूक प्रकरणी कारवाई;एक जण ताब्यात

**सातारा/प्रतिनिधी:-**

महाराष्ट्र पोलीस यांच्या सातारा शहर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने अवैध विदेशी दारू वाहतूक करणाऱ्या पार्थ अनिल काटे वय १९ अमरलक्ष्मी स्टॉप देगाव सातारा यांच्यावर कारवाई करत ताब्यात घेतले त्याच्याकडून तब्बल ५,१५,९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई तुषार दोशी (पोलीस अधीक्षक, सातारा), डॉ. वैशाली कडूकर (अप्पर पोलीस अधीक्षक) व राजीव नवले (उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

दि. १७ मार्च २०२६ रोजी डी.बी. पथक पेट्रोलिंग करत असताना सातारा शहरातील एम.आय.डी.सी. परिसरातील फुलोरा हॉटेल परिसरात एका चारचाकी वाहनातून बेकायदेशीर दारू वाहतूक होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून संशयित वाहन थांबवून तपासणी केली असता, वाहनाच्या डिकीत विदेशी दारूचे दोन बॉक्स आढळून आले.



या कारवाईत १५,९४० रुपये किमतीची दारू व वाहतुकीसाठी वापरलेले चारचाकी वाहन असा एकूण ५,१५,९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश माने यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाचे पोलीस निरीक्षक सुधीर मोरे व त्यांच्या पथकातील अधिकाऱ्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# कराड शहरात पोलिसांचा 'रूट मार्च'

**कराड/प्रतिनिधी:-**

गुढीपाडवा आणि रमजान ईद या सणांच्या पार्श्वभूमीवर कराड शहरात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सुरक्षित वातावरण कायम राहावे, यासाठी कराड शहर पोलिसांनी बुधवारी भव्य 'रूट मार्च' काढत सज्जतेचे दर्शन घडवले.

सायंकाळी पाचच्या सुमारास शहर पोलीस ठाण्यातून या रूट मार्चची सुरुवात झाली. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा ताफा शिस्तबद्ध पद्धतीने शहराच्या प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत नागरिकांना कायदा व सुव्यवस्थेचा ठोस संदेश दिला.



शहरातील मुख्य बाजारपेठांसह संवेदनशील भागांचा या मार्चमध्ये समावेश करण्यात आला. शाहू चौक, दत्त चौक, आझाद चौक आणि चावडी चौक या गजबजलेल्या ठिकाणांमधून रूट मार्च काढण्यात आला. पुढे कन्या शाळा परिसर, जोतिबा मंदिर मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ओलांडत हा ताफा प्रभात टॉकिज परिसरात दाखल झाला.

शहरातील विविध भागांतून फेरी पूर्ण केल्यानंतर प्रभात टॉकीज येथे या रूट मार्चचा समारोप करण्यात आला. त्यानंतर सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी पुन्हा शहर पोलीस ठाण्यात परतले.

# जयंत पाटील-गोपीचंद पडळकर समर्थकांची घोषणाबाजी

**पान १ वरून..**

यांचे समर्थक एकमेकांसमोर आल्याने प्रचंड तणाव निर्माण झाला. महाविकास आघाडीच्या विजयाचा जल्लोष सुरू असतानाच दोन्ही गटांमध्ये झालेल्या जोरदार घोषणाबाजीमुळे वातावरण तापले होते.

जिल्हा परिषदेत महाविकास आघाडीच्या विजयाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर गोपीचंद पडळकर इमारतीबाहेर आले. यावेळी तिथे उपस्थित असलेल्या जयंत पाटील समर्थकांनी त्यांना घेरले आणि घोषणाबाजी सुरू केली. आता कसं वाटतंय, गार-गार वाटतंय अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. विशेष म्हणजे, पडळकर यांच्या समोरच ही घोषणाबाजी सुरू राहिल्याने वातावरण अधिकच चिघळले.

सुरुवातीला शांत असलेल्या पडळकर समर्थकांनीही नंतर आक्रमक पवित्रा घेतला. जयंत पाटील समर्थकांच्या घोषणांना पडळकर समर्थकांनीही प्रति-घोषणांनी उत्तर दिले. दोन्ही बाजूने कार्यकर्ते भिडण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त दोन्ही बाजूच्या समर्थकांना बाजूला केले.

# केवायसी न केल्यास पेन्शन बंद

## कराडमधील ७११ लाभार्थ्यांना अंतिम इशारा;३० मार्चपर्यंत आधार प्रमाणीकरण अनिवार्य

**कराड/प्रतिनिधी:-**

विशेष सहाय्य योजनांअंतर्गत पेन्शन घेणाऱ्या लाभार्थ्यांसाठी केवायसी (घधउ) प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली असून, ही प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्यांची पेन्शन थेट बंद केली जाणार असल्याचा इशारा तहसील प्रशासनाने दिला आहे. कराड तालुक्यातील तब्बल ७११ लाभार्थ्यांनी अद्याप केवायसी पूर्ण केलेली नसल्याचे समोर आले आहे.

संजय गांधी निराधार योजना, तसेच श्रावणबाळ सेवा राज्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात दरमहा थेट लाभ हस्तांतरण (उइढ) पद्धतीने पेन्शन जमा केली जाते. मात्र, या प्रक्रियेसाठी आधार प्रमाणीकरणासह केवायसी करणे अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

याबाबत तहसीलदार कल्पना ढवळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित लाभार्थ्यांना यापूर्वीही वेळोवेळी सूचना देण्यात आल्या होत्या. तरीही अनेकांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे आता लेखी नोटीस देऊन अंतिम मुदत जाहीर करण्यात आली आहे.

ज्या लाभार्थ्यांनी अद्याप केवायसी केलेली नाही, त्यांनी ३० मार्च २०२६ पर्यंत तहसील कार्यालय, कराड (संजय गांधी शाखा) येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून आधार कार्ड, बँक पासबुक आणि आवश्यक कागदपत्रांसह केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. दिव्यांग लाभार्थ्यांनी युडीआयडी (णऊखऊ) कार्डही सादर करणे बंधनकारक आहे.

निर्धारित मुदतीत केवायसी न केल्यास संबंधित लाभार्थ्यांची पेन्शन थांबविण्याचा निर्णय घेतला जाणार असून, त्याची संपूर्ण जबाबदारी लाभार्थ्यांवरच राहील, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.




# कृष्णा बँकेच्या तीन शाखांचा तीन जिल्ह्यात शुभारंभ

**कराड/प्रतिनिधी : -**

ग्रामीण भागातील शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी विश्वासार्ह आर्थिक सेवा देणारी कृष्णा सहकारी बँक आता अधिक व्यापक झाली असून, कराड, वाळवा आणि शिराळा तालुक्यांत एकाच दिवशी तीन नव्या शाखांचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. या विस्तारामुळे ग्रामीण भागातील बँकिंग सेवा अधिक सुलभ होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कराड तालुक्यातील मुंढे येथे बँकेच्या २६ व्या शाखेचे उद्घाटन यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलताना त्यांनी, कृष्णा बँकेने नेहमीच सर्वसामान्यांचे आर्थिक हित जपले असून, ग्राहकांच्या विश्वासावरच बँकेने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा स्वीकार करून ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा देण्याचा बँकेचा प्रयत्न आहे, असे सांगितले.

दरम्यान, शिराळा तालुक्यातील शेडगेवाडी येथे २५ व्या शाखेचे उद्घाटन जि. प. सदस्या साईतेजस्वी देशमुख यांच्या हस्ते झाले. नव्या शाखेमुळे स्थानिक नागरिकांना घराजवळ बँकिंग सुविधा उपलब्ध होणार असून, परिसराच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

वाळवा तालुक्यातील कासेगाव येथे ज्येष्ठ नेते ड. बी.डी. पाटील यांच्या हस्ते, कुमार पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शाखेचा शुभारंभ करण्यात आला. या तिन्ही कार्यक्रमांना विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, बँकेचे संचालक, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पहिल्याच दिवशी ठेवींचा विक्रम

कृष्णा सहकारी बँकेच्या नव्या शाखांना ग्राहकांचा पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तिन्ही शाखांमध्ये मिळून तब्बल ९ कोटींहून अधिक ठेवी जमा झाल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी भगवान जाधव यांनी दिली. ग्राहकांच्या या विश्वासामुळे बँकेच्या पुढील वाटचालीला अधिक बळ मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# खानापूर मतदार संघातील उर्वरित गावांसाठी लवकरात लवकर नळ पाणीपुरवठा योजना

## मुंबई मंत्रालयात बैठक;आ.सुहास बाबर यांच्या पाठपुराव्याला यश

**विटा/शिराज शिकलगार:-**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील खानापूर आटपाडी आणि विसापूर सर्कलचे विद्यमान आमदार सुहास बाबर यांनी खानापूर विधानसभा मतदारसंघातील उर्वरित गावांना स्वच्छ व शुद्ध पाण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या नळ पाणीपुरवठा योजनेला लवकरच मंजुरी मिळणार असल्याची माहिती आ. सुहास बाबर यांनी दैनिक प्रीतिसंगमचे प्रतिनिधी शिराज शिकलगार यांना माहिती दिली.

या संदर्भात त्यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला असून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. यासंदर्भात आ. बाबर यांनी राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांना यापूर्वी पत्र देऊन बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने मुंबई येथील मंत्रालयात संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थित महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत खानापूर, आटपाडी आणि तासगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये सुरू असलेल्या तसेच पूर्ण झालेल्या नळ पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेतला आणि गावांमधील वाड्या वस्त्यांचा या योजनेमध्ये समावेश राहिल्याने त्या भागातील नागरिकांना अद्यापही पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत असल्याचे आ. सुहास बाबर यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले.



खानापूर तालुक्यातील बामणी, सुलतानगादे, कार्वे, कळंबी, बलवडी (भा.), बेनापुर व वाळूज, आटपाडी तालुक्यातील पात्रेवाडी, बोंबेवाडी, बाळेवाडी, चिंचाळे, घाणंद, नेलकरंजी, खरसुंडी, वलवण, आंबेवाडी, पिंपरी बुद्रक, आवळाई, हिवतड, तडवळे, व दिघंची तसेच तासगाव तालुक्यातील चिखलगोठण, या गावातील वाड्या वस्त्यांचा नळ पाणीपुरवठा योजनेत समावेश करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा केली. या चर्चेद्वारे, रु. ५० लाखांपर्यंत वाढ असलेल्या गावांच्या पाणीपुरवठा योजनांची मंजुरी विभागीय आयुक्त स्तरावर देण्यात येणार असून मतदार संघातील एका गावाच्या योजनेला विभागीय आयुक्त यांचेकडून मंजुरी मिळणार आहे, तसेच रु.५०लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतच्या सुधारित पाणीपुरवठा योजनांना मंत्रालय स्तरावर मंजुरी देण्यात येणार असून येत्या पंधरा दिवसात सर्व सुधारित पाणीपुरवठा योजनांना मंजुरी देण्याच्या सूचना मंत्री महोदय यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

आ.सुहास बाबर यांनी उर्वरित गावांमधील वाड्या वस्त्यांचा या योजनेत समावेश करून सुधारित अंदाजपत्रकास तातडीने प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी केली होती. यावर मंत्री गुलाबराव पाटील यांनी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे आ. सुहास बाबर यांच्या पाठपुराव्याला यश आले.